नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in ✉ nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १४२ * | * अमरावती * | मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## अहमदाबादेत ९२५ बेकायदा बांधकामे पाडली

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २४ :
चांदोला तलावानंतर, गुजरातमधील अहमदाबादमध्ये आणखी एक मोठी बांधकामे पाडण्याची कारवाई सुरू आहे. शहराच्या पूर्वेकडील इसानपूर तलावाभोवती असलेली घरे आणि दुकाने पाडली जात आहेत. सोमवार सकाळपासून सुरू झालेली ही अतिक्रमण हटाव मोहीम चार टप्प्यात राबवली जाईल.

या उपक्रमांतर्गत, तलावाच्या किनाऱ्यावरील ९२५ बेकायदेशीर घरे आणि दुकाने पाडली जातील. या घरांमध्ये १,००० हून अधिक लोक राहतात. कडक पोलिस बंदोबस्तात, २० जेसीबी मशीन आणि ५०० महापालिका कर्मचारी आणि कामगारांची टीम तैनात करण्यात आली आहे.

अग्रालेख

## खरीखरी..

## धरमजी

कोणे एकेकाळी बॉलीवूड गाजवणाऱ्या धरमसिंह देओल उर्फ धर्मेंद्र या दिग्गज अभिनेत्याच्या परिपूर्ण जीवनाचा अध्याय आज समाप्त झाला. धरमजींनी आपल्या सुरुवातीच्या काळात शेतीमध्ये काम केले होते, आपण मातीशी जुळलेले आहोत हे त्यांनी अभिमानाने नेहमीच सांगितलेले होते. धरमजींनी यामुळेच कदाचित एक अतिशय सुंदर बाग उभारली होती. उमेदीच्या काळात मुंबईला आल्यावर त्यांनी दिग्गज अभिनेत्री मीनाकुमारी यांच्या सोबत अनेक चित्रपट केले तेव्हा ते नवखे होते परंतु त्यावेळी मीनाकुमारी अत्यंत प्रसिद्ध होत्या. त्यांच्या नावावर अनेक प्रसिद्ध चित्रपट होते. त्यातील काजल, पुण्यप्रसून, फकीरा हे चित्रपट सर्वांच्या स्मरणात राहिले. अत्यंत गाजलेल्या शोले मध्ये सुद्धा मीनाकुमारी एका सहाय्यक अभिनेत्रीच्या भूमिकेमध्ये दिसल्या. याशिवाय बंदिश, एक फुल चार कांटे, घराणा, मोहब्बत की कसम अशा चित्रपटांमुळे धर्मेंद्र आणि मीनाकुमारी यांची प्रेक्षकांमध्ये वाहवा झाली. मात्र धरमजींना खरी प्रसिद्धी मिळाली. ती शोलेमधील भूमिकेमुळे कारण जय आणि वीरूचे संवाद वर्षानुवर्षे प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. जय आणि वीरू यांच्या धमाल अभिनयाने हा सिनेमा बघणारे प्रेक्षक आणि सिनेमागृह अक्षरशा भारून जात असे. शोलेतील संजीव कुमार, आसरानी, अमजद खान, एके हंगल यांच्या भेटीला आता धरमजी गेलेले आहेत. धरमजी यांची पहिली पत्नी प्रकाश कौर आणि त्यांचे दोन सुपुत्र सनी देओल आणि बॉबी देओल यांच्यासोबत त्यांच्या दोन बहिणी असा धरमजींचा पहिला संसार होता. त्यानंतर ड्रीमगर्ल म्हणजेच हेमामालिनी ही संपूर्ण देशाची स्वप्नसुंदरी त्यांच्या जीवनात आली. त्यांनी दुसरा विवाह केला त्यासाठी या पंजाबच्या जट्टाने तात्पुरता आपला धर्मही बदलला. पण तो आपल्या लग्नाला अधिकृत करून आणण्यासाठी बदलला होता. यातील महत्त्वाची मोठेपणाची गोष्ट कुठली असेल तर ती त्यांची पत्नी प्रकाश कौर यांची आहे. कारण आपल्या बलदंड नवऱ्याला स्वप्नसुंदरी पसंत पडली. तेव्हा त्या गोष्टीचे आपले मन मारूनही या मोठ्या मनाच्या महिलेने स्वागत केले. हेमामालिनी यांना धरमजी यांच्याकडून दोन कन्या झाल्या. धरमजींनी आपली साडेपाचशे कोटींची संपत्ती आपल्या कुटुंबात व्यवस्थितपणे वाटून टाकली त्यामध्ये आपल्या दोन्ही पत्नींना दोन-दोनशे कोटी रुपये आणि उरलेले १५० कोटी रुपये चारही मुलींना सम प्रमाणात वाटले. मुलांसाठी त्यांनी वेगळी तजवीज केली होती. त्यांचे एक अत्याधुनिक थिएटर आहे, ते त्यांनी सनी देओलला दिले आणि त्यांच्या अनेक उत्तम हॉटेल्सची मालकी बॉबी देओलला सोपविली. त्यांनी फुलवलेल्या मोठ्या बागेचे वाटपही आपल्या दोन पत्नींना समान केले. सनी देओल याची स्वतःची प्रचंड कमाई आहे. बॉबीला तर अनेक हॉटेलमधून चांगला पैसा मिळतो आहे. आम्ही हे सर्व सांगायचे कारण असे आहे की धर्मेंद्रजींचा अभिनय आणि त्यांच्या चित्रपटाबद्दल आतापर्यंत बरीच चर्चा झालेली आहे, यापुढेही होईलच. दोन लग्न केल्यानंतर त्यांचा जो कुटुंबकबीला आहे त्यांच्यामध्ये आपल्या संपत्तीची वाटणी ज्या आदर्श पद्धतीने त्यांनी केली, ती आम्हाला महत्त्वाची वाटते. जुन्या काळातील अनेक प्रसिद्ध अभिनेत्यांचे उत्तर आयुष्य प्रचंड हलाखीत गेल्याचे आपण बघितलेले आहे. आताचे अनेक अभिनेते किंवा अभिनेत्री भविष्यकालीन तरतुदींसाठी योजनाबद्ध व्यवस्था करतात. तेच काम धरमजींनी कित्येक वर्षांपूर्वी नियोजन करून व्यवस्थितपणे करून टाकलेले होते. आपल्या मराठीतील प्रचंड लोकप्रिय असलेल्या भगवान दादा यांनी प्रचंड पैसा कमावला, लोकप्रियताही मिळवली. पण शेवटचे दिवस त्यांना अत्यंत हाल अपेष्टांत काढावे लागले ही गोष्ट कोणीही नाकारू शकत नाही. धरमजींचे जाणे निश्चितच वेदनादायक आहे तरीही त्यांनी चित्रपटाच्या मोहमयी जगात राहून आपला दुहेरी संसार यशस्वी केला आणि सुखासमाधानाने या जगाचा निरोप घेतला, त्यांना श्रद्धांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## बसच्या दोन वेगवेगळ्या अपघातात
# ११ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था
तेनकासी/टिहरी, दि. २४ :
तामिळनाडू आणि उत्तराखंड या दोन राज्यात झालेल्या बसच्या दोन वेगवेगळ्या अपघाता ११ जणांचा जीव गमवावा लागला. या दोन्ही अपघातात ५० पेक्षा अधिक प्रवासी जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

तामिळनाडूच्या तेनकासी जिल्ह्यात सोमवारी दोन बसेसमध्ये समोरासमोर झालेल्या धडकेत ६ जणांचा मृत्यू झाला तर ३० प्रवासी जखमी झाले. मृतांमध्ये पाच महिला आणि एका पुरूषाचा समावेश आहे. सोमवारी सकाळी ११ वाजता मदुराईहून सेनकोट्टईला जाणारी बस आणि तेनकासीहून कोविलपट्टीला जाणारी बस यांच्यात टक्कर झाली. पोलिसांनी सांगितले की, तपासात चालकाची चूक असल्याचे समोर आले आहे. मदुराईहून सेनकोट्टईला जाणारी बस बेपर्वाईने आणि वेगाने चालवत होती.

जखमी प्रवाशांवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. काही जखमींची प्रकृती गंभीर आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो असे पोलिसांनी सांगितले. बसमध्ये अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी जेसीबीचा वापर करण्यात आला. बसचे खराब झालेले भाग कापून त्यांना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर २५ हून अधिक रुग्णवाहिका बोलावून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. दोन्ही बसमध्ये किमान ५५ जण होते.





### बस दरीत कोसळून ५ ठार

उत्तराखंडच्या टिहरी जिल्ह्यात सोमवारी सकाळी कुंजपुरी मंदिराजवळ एक हृदयद्रावक बस अपघात घडला. कुंजपुरीकडे जात असलेली खाजगी प्रवासी बस अचानक नियंत्रणाबाहेर गेली आणि सुमारे २०० ते २५० मीटर खोल दरीत कोसळली.

या भीषण अपघातात किमान पाच जणांचा मृत्यू झाला असून २० हून अधिक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. बसमध्ये प्रामुख्याने स्थानिक रहिवासी आणि कुंजपुरी मंदिरात येणारे भाविक होते. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार सकाळी ९:३० च्या सुमारास चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याने घसरून थेट दरीत कोसळली.

जिल्हा प्रशासन आणि एसडीआरएफ जखमींना जवळच्या रुग्णालयात नेत आहेत, तर गंभीर जखमींना एम्स, ऋषिकेश येथे रेफर करण्यात आले आहे. त्यांनी या संदर्भात स्थानिक अधिकाऱ्यांशी सतत संपर्क साधल्याचे सांगितले.

अपघाताचा आवाज ऐकून जवळच्या गावातील लोक घटनास्थळी धावले. दोरी, बांबूचे खांब आणि उपलब्ध साधनांचा वापर करून त्यांनी सर्वप्रथम जखमींना वाचवले.

काही वेळातच पोलिस, एसडीआरएफ आणि जिल्हा प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. उंच कडा आणि घनदाट जंगलात चालवण्यात आलेल्या बचाव कार्यात अनेक अडचणी आल्या, परंतु सर्वांनी एकत्र येऊन काम सुरू ठेवले.

## ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र
# यांचे निधन

### विलेपार्ले स्मशानभूमीत अंत्यसंस्कार



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन झाले. ८९ वर्षीय त्यांनी सोमवारी दुपारी त्यांच्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पार्थिवावर विलेपार्ले स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी देओल कुटुंबियांसह अमिताभ बच्चन, सलमान खान, संजय दत्त, आमिर खान यांच्यासह अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते.

धर्मेंद्र यांच्या निधनावर देशभरातून शोक व्यक्त केला जात असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाला एका युगाच्या अंताचे चिन्ह म्हटले आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील ही-मॅन म्हणून ओळखले जाणारे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांची गेल्या काही दिवसांपासून तब्येत चिंताजनक होती. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. काही दिवस आयसीयूमध्ये राहून उपचार घेत असताना, कुटुंबीयांनी त्यांना घरी आणले. मात्र, आज सकाळी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

धर्मेंद्र यांना हृदय व श्वसनाशी संबंधित समस्या कालांतराने वाढत होत्या. नोव्हेंबरच्या सुरुवातीला श्वासोच्छवासात त्रास झाल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले होते. व्हेंटिलेटरवर राहून त्यांच्यावर उपचार सुरू होते. काही दिवसांपूर्वी त्यांच्या निधनाच्या अफवा पसरल्या होत्या, परंतु कुटुंबाने त्या खोट्या असल्याचे स्पष्ट केले होते. धर्मेंद्र यांच्या निधनाची बातमी समोर आल्यावर बॉलीवुडमध्ये शोककळा पसरली. अमिताभ बच्चन हे विलेपार्ले येथील शवागारात प्रथम पोहोचले.

धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमधील लुधियाना येथे झाला. १९६० मध्ये दिल भी तेरा हम भी तेरे या चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. शोले, चुपके चुपके,धर्मवीर, कर्तव्य, चाचा भतिजा, सम्राट, यांसह ३०० पेक्षा अधिक चित्रपटांत त्यांनी विविध आणि वेगळ्या भूमिका साकारल्या.

२०१२ मध्ये त्यांना भारत सरकारच्या पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रॉकी और रानी की प्रेम कहानी (२०२३) आणि तेरी बातों में ऐसा उलझा जिया हे त्यांचे अलीकडील चित्रपट होते. येणाऱ्या इक्किस चित्रपटातून त्यांची शेवटची भूमिका प्रेक्षकांना बघायला मिळणार होती. धर्मेंद्र यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीत एक अमूल्य कोहिनूर हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

### पीएम मोदी आज करणार
## अयोध्येत ध्वजारोहण



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २४ :
२५ नोव्हेंबर रोजी अयोध्येत होणाऱ्या भव्य ध्वजारोहण समारंभाची तयारी पूर्ण झाली आहे. रामनगरी वधूसारखी सजवण्यात आली आहे. २५ नोव्हेंबर रोजी अयोध्येत सात ध्वजारोहण केले जातील. पंतप्रधान राम मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करतील आणि राम मंदिराच्या किल्ल्यातील सहा मंदिरांवरही ध्वजारोहण केले जाईल. समारंभात उपस्थित असलेले इतर पाहुणे या मंदिरांवर ध्वजारोहण करतील. हे सर्व ध्वज अहमदाबादमध्ये बनवण्यात आले आहेत.

राम मंदिराच्या शिखरावर फडकवण्यात येणारा ध्वज भगव्या रंगाचा आहे, जो २२ फूट लांब आणि ११ फूट रुंद आहे. ध्वजात सूर्यदेव, कोविदार वृक्ष आणि ओम चिन्ह आहेत. हा ध्वज जमिनीपासून १९१ फूट उंचीवर फडकवण्यात येईल. राम मंदिराचा वरचा भाग १६१ फूट उंच आहे, ज्यावर ध्वजस्तंभ आहे. दोरी वापरून जमिनीपासून १९१ फूट उंचीवर ध्वज फडकवला जाईल. ध्वज फडकवण्यासाठी एक बटण देखील लावण्यात आले आहे.

## न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी घेतली सरन्यायाधीशपदाची शपथ



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी भारताचे ५३वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

माजी सरन्यायाधीश बी.आर. गवई हे नुकतेच निवृत्त झाल्याने त्यांच्या जागी न्यायमूर्ती सूर्यकांत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे मूळ हरियाणातील हिसार येथील मध्यमवर्गीय कुटुंबाशी संबंधित आहे. १० फेब्रुवारी १९६२ रोजी जन्मलेल्या सूर्यकांत यांनी आपल्या कारकिर्दीत पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयात अनेक महत्त्वपूर्ण निकाल दिले.

२०१८ मध्ये त्यांची हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांच्या संतुलित, संवेदनशील आणि धारदार न्यायनिर्णयांच्या शैलीमुळे ते देशभरात ओळखले जातात. नवीन सरन्यायाधीश म्हणून सूर्यकांत यांचा कार्यकाळ २४ नोव्हेंबर २०२५ ते ९ फेब्रुवारी २०२७ असा असेल.

## आंदोलनात झळकले हिडमाचे पोस्टर



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
दिल्लीतील इंडिया गेटवर वायू प्रदूषणाविरुद्ध निदर्शने करणाऱ्या लोकांनी देशातील मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी कमांडर माडवी हिडमाचे (४४) पोस्टर झळकावले. पोस्टरमध्ये हिडमाची तुलना आदिवासी स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांच्याशी करण्यात आली होती. त्याचे जल, जंगल आणि जमिनीचे रक्षक म्हणून वर्णन करण्यात आले होते.

निदर्शकांनी माडवी हिडमा जिंदाबाद अशा घोषणा दिल्या. त्यांच्या हातात माडवी हिडमाला लाल सलाम अशा घोषणा असलेले पोस्टर्स होते. एका निदर्शकाच्या पोस्टरवर लिहिले होते, बिरसा मुंडा ते माडवी हिडमा पर्यंत, आपला जंगले आणि पर्यावरणासाठीचा संघर्ष सुरूच राहील. निदर्शनादरम्यान जमावाने पोलिसांशी झटापट केली. निदर्शकांनी पोलिसांवर पेपर स्प्रेचा वापर केला, ज्यामध्ये तीन ते चार पोलिस जखमी झाले. सोमवारी दिल्ली पोलिसांनी काही आंदोलकांना ताब्यात घेतले.

## सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

स्वप्नाळू, युवा नायक ते तडफदार-बलंदड नायक म्हणून साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि पुढे बॉलिवुडचा ही-मॅन म्हणून लौकिक मिळवेलेले ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र चित्रपट रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

धर्मेंद्र यांचा हिंदी चित्रपट सृष्टीतला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण राहिला आहे. शोले चित्रपटातील पडद्यावरील वीरू प्रमाणेच ते प्रत्यक्षातही मैत्र जपणारे होते. सहृदय आणि जुन्या-नव्या पिढीला जोडणारे, अनेकांसाठी आधार, मार्गदर्शक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. या क्षेत्रातील ज्येष्ठत्व ते तितक्याच उमद्यापणाने मिरवत असत.

एकाच वर्षांत नऊ हिट चित्रपट देण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत ते चित्रपट सृष्टीत सक्रिय राहिले. त्यांच्या निधनाने आपल्या चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला आहे, अशा भावना फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

## स्वदेशी बनावटीची युद्धनौका आयएनएस माहे भारतीय नौदलात दाखल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
स्वदेशी बनावटीची युद्धनौका आयएनएस माहे सोमवारी भारतीय नौदलात दाखल झाली. ही पहिली माहे-श्रेणीची पाणबुडीविरोधी आणि उथळ पाण्यातील युद्धनौका आहे, जी विशेषतः किनारी ऑपरेशन्ससाठी डिझाइन केलेली आहे.

मुंबईतील समारंभात लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी प्रमुख पाहुणे होते. द्विवेदी यांनी तिन्ही दलांच्या एकत्रित ताकदीवर भर दिला. ते म्हणाले, सशस्त्र दलांची सर्वात मोठी ताकद म्हणजे समन्वय. ऑपरेशन सिंदूर हे याचे एक उत्तम उदाहरण आहे.




## एका तेजस्वी पर्वाचा अंत : उपमुख्यमंत्री अजित पवार



हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका तेजस्वी पर्वाचा अंत झाला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शोकभावना व्यक्त केल्या.

धर्मेंद्र यांच्या अभिनयात नैसर्गिकता, साधेपणा आणि मनाला भिडणारी भावनिक ताकद होती.त्यांनी अनेक पिढ्यांतील प्रेक्षकांना आपल्या अभिनयातून निखळ आनंद दिला. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे.

## ॲग्रोव्हीजनचे कार्यक्रम आता वर्षभर

### ॲग्रोव्हीजन कृषि प्रदर्शनाचा समारोप : लाखों शेतकऱ्यांनी दिली भेट



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :
वार्षिक कृषिप्रदर्शन आणि ज्ञानवर्धक परिषदा, चर्चासत्रानि परिपूर्ण अश्या ॲग्रोव्हीजनचे कार्यक्रम आता वर्षभर होणार आणि शक्य झाल्यास पुढील वर्षी अमरावती रोडवरील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ग्राउंडवर तयार होत असलेल्या कन्व्हेंशन सेंटर मध्ये ॲग्रो व्हिजनचे आयोजन करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचा आशावाद केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. ते चार दिवसीय आयोजनाच्या समरोपीय समारंभात बोलत होते.

यावेळी मंचावर केंद्रीय कृषि राज्यमंत्री आशीष जैसवाल, सिने अभिनेते प्रवीण तरडे, ॲग्रोव्हीजनचे आयोजक सचिव रवी बोरटकर, डॉ. सी डी मायी, पीडीकेव्ही अकोलाचे

▶▶ पान ८ वर






# धर्मेंद्र यांना श्रद्धांजली

## वीरू' आजही घनिष्ठ मैत्रीचे प्रतीक : शरद पवार



**मुंबई:** शरद पवार अभिनेते धर्मेंद यांना श्रद्धांजली वाहताना म्हणाले, 1960 च्या दशकात भारतीय सिनेसृष्टीत पदार्पण करून चित्रपटात सर्वसामान्य माणसांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या कथानकांमधून उठावदार भूमिका साकारणारे आणि भारतीय प्रेक्षकांची मनं जिंकून सिनेजगतात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र देओल यांची मृत्यूशी झुंज अखेर अपयशी ठरली. आताच्या तरुणाईला कल्पना नसेल पण एक पिढी त्यांच्या लकबीची, त्यांच्या केशभूषेची, वेशभूषेची चाहती होती.

## ही-मॅनची एक्झिट वेदनादायक



**मुंबई:** भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, पद्मभूषण धर्मेंद्र यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायक आहे. त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वाने, प्रभावी संवादशैलीने आणि हृदयाला भिडणाऱ्या अभिनयाने त्यांनी भारतीय सिनेमाला एक वेगळं स्थान प्राप्त करून दिले. 300 हून अधिक चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारत त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आणि बॉलिवूडचा ही-मॅन अशी एक वेगळी ओळख प्रस्थापित केली. आज जरी एक सुवर्णयुग संपले असले, तरी धर्मेंद्र यांच्या अभिनयाची आणि संस्कारांची अमिट छाप सदैव आपल्या स्मरणात राहील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, अशा शब्दात माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या.

## गुंतागुंतीच्या जगातला सरळ माणूस हरवला : राज ठाकरे



**मुंबई:** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी धर्मेंद्र यांच्या रुपाने सध्याच्या गुंतागुंतीच्या जगातला एक सरळ माणूस हरवल्याची भावना व्यक्त केली आहे. ते म्हणाले, ज्येष्ठ अभिनेते धर्मेन्द्रजींचं निधन झालं. भारतीय सिनेमात 'सुपरस्टार' म्हणलं की त्याच्या झंझावाताचा एक काळ असतो आणि तो ओसरण्याचा पण एक काळ असतो. पण याला अपवाद म्हणजे धर्मेंद्रजी. एकापेक्षा एक सुपरहिट सिनेमे दिले, पण सुपरस्टारचं बिरुद त्यांना चिकटलं नाही म्हणा किंवा त्यांनी चिकटू दिलं नाही. मला चिकटू दिलं नाही असंच जास्त वाटतं, कारण धर्मेन्द्रजींच्या बाबतीत त्यांचं प्रतिमेहून प्रत्यक्ष उत्कट असं होतं. 1960 च्या दशकात धर्मेंद्र नावाचा एक देखणा, शरीराने अतिशय सुदृढ, मोहक हास्य, मर्दानीपणा सहज जाणवत असला तरी त्यात कुठेही दांडगाई नाही, अशा एका व्यक्तिमत्वाचा एक तरुण पडद्यावर झळकला. चित्रपटसृष्टीवर गारुड केलं.

## हिंदी चित्रपटसृष्टीचे एक पर्व काळाच्या पडद्याआड : सुप्रिया सुळे



**मुंबई:** राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही धर्मेंद्र यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले आहे. प्रख्यात चित्रपट अभिनेते तथा माजी खासदार धर्मेंद्र यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांनी 300 हून अधिक चित्रपटांमधून भूमिका साकारल्या. चित्रपट रसिकांच्या मनावर त्यांनी अधिराज्य गाजविले. पंजाबमधील एका छोट्या गावातून मुंबईत येऊन त्यांनी अभिनयाच्या क्षेत्रात आपले अढळ स्थान निर्माण केले. त्यांच्या या क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या निधनामुळे हिंदी चित्रपटसृष्टीचे एक पर्व काळाच्या पडद्याआड गेले, असे त्या म्हणाल्या.

## भारतीय चित्रपट क्षेत्रातील सुवर्णयुग हरपले : विजय वडेट्टीवार



**मुंबई:** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी धर्मेंद्र यांच्या निधनामुळे भारतीय सिनेसृष्टीतील एक सुवर्णयुग हरपल्याची भावना व्यक्त केली. भारतीय चित्रपटसृष्टीतील महानायक, ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपट क्षेत्रातील एक सुवर्णयुग हरपल्याची पोकळी निर्माण झाली आहे. अभिनयातील सहजता, भूमिकांमधील विविधता आणि प्रेक्षकांवर अमिट छाप टाकण्याची विलक्षण ताकद धर्मेंद्र यांनी आपल्या कारकिर्दीत दाखवून दिली. तीनशेहून अधिक चित्रपटांमधून त्यांनी सामान्य माणसांच्या भावना मोठ्या पडद्यावर जिवंत केल्या. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो. त्यांच्या परिवाराला, चाहत्यांना आणि भारतीय चित्रपटसृष्टीला ही अपरिमित हानी सहन करण्याची शक्ती मिळो, ही प्रार्थना, असे ते म्हणाले.

# मुंबईतील कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार : मुख्यमंत्री फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामे आगामी पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईच्या पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण जोडणीला वेग देणार, अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत. मुंबईतील वरळी डोम येथे इंडियाज इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आयोजित यूथ कनेक्ट कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सी-लिंकचा वसोर्वा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. सध्या मुंबईतील 60 टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बीकेसी ते इतर भागांना जोडणारे बोगदे, नवीन लिंक रोड नेटवर्क, ओव्हर एक्स्प्रेसवे कनेक्शन आदी प्रकल्पांमुळे शहरातील प्रवासाचा सरासरी वेग मोठ्या प्रमाणात वाढेल. मुंबईत पूर्णतः बोगदे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पुढील पाच वर्षात मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल. मुंबई वन हा एकात्मिक मोबिलिटी ॲप नागरिकांसाठी वन-स्टॉप सोल्युशन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पालकांमध्ये खासगी शाळांविषयी आकर्षण वाढल्याने शासकीय व महानगरपालिका शाळांची संख्या कमी होत आहेत असे चित्र समोर आले. परंतु वास्तवात परिस्थिती बदलत आहे. महानगरपालिकांच्या शाळांना आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत नेण्याचा संकल्प असून मुंबई महानगरपालिकाकडे ती क्षमता आहे. शासकीय शाळांना योग्य प्रशिक्षण, अध्यापन पद्धती आणि पायाभूत सुविधा दिल्यास त्या खासगी शाळपेक्षा सरस ठरतील, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. आजच्या लोकशाहीत युवा नागरिक फक्त दर्शक नसून स्वतःचे मत असलेले महत्त्वाचे स्टेकहोल्डर्स आहेत. युवांच्या मतांना स्थान दिल्याशिवाय लोकशाहीची प्रक्रिया पुढे जाऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पर्यावरण बदल ही केवळ पुस्तकी चर्चा नसून वास्तवातील मोठी समस्या आहे. आपण हवामान बदलाचा अनुभव घेणारी पहिली पिढी आहोत आणि त्याबद्दल काहीतरी करू शकणारी शेवटची पिढी आहोत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषणाची सर्वात मोठी कारणे असतात, त्यामुळे मुंबईत वाहतूक व्यवस्था इलेक्ट्रिक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो संपूर्णपणे इलेक्ट्रिक आहे. पुढील टप्प्यात सार्वजनिक वाहतुकीला पूर्णपणे शून्य-उत्सर्जनच्या दिशेने नेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक वर्षे मुंबईचे सांडपाणी थेट समुद्रात सोडले जात होते, मुंबईसारख्या महानगराचा 100 टक्के सीवेज समुद्रात टाकला जाणे योग्य नाही. त्यामुळे नियम तयार करून आता संपूर्ण मुंबईत सीवेज ट्रीटमेंट प्लांट्स उभारत आहोत. पुढील वर्षापर्यंत 100 टक्के ट्रीटेड पाणीच समुद्रात सोडले जाईल. त्याचबरोबर धारावीच्या पुनर्विकासात 30 टक्के क्षेत्र पूर्णपणे अनडेव्हलपेबल ठेवले जाणार असून त्यामुळे प्रचंड प्रमाणात ओपन आणि ग्रीन स्पेसेस निर्माण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## पंकजा मुंडे यांच्या स्वीय सहाय्यक अनंत गर्जेला अटक



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २४ :

राज्याच्या कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांना स्वतःच्या पत्नीस आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. गर्जे रविवारी मध्यरात्री 1 च्या सुमारास स्वतःहून पोलिसांना शरण आले होते. आज त्याला कोर्टापुढे हजर केले असता कोर्टाने त्याला 27 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. अनंत गर्जे यांच्या पत्नी डॉक्टर गौरी पालवे - गर्जे यांनी शनिवारी सायंकाळी वरळी स्थित आपल्या राहत्या गळफास लावून आत्महत्या केली होती. अनंत गर्जे व गौरी यांचा काही महिन्यांपूर्वीच विवाह झाला होता. पण त्यानंतर अनंत यांचे कथित विवाहबाह्य संबंध असल्याची बाब गौरी यांच्या निदर्शनास आली होती. या प्रकरणी गौरी यांच्या माहेरच्या लोकांनी अनंत गर्जे यांच्यासह त्यांची बहीण शीतल गर्जे - आंधळे व दीर अजय गर्जे यांच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कलमासह इतर प्रकरणांत गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अनंत हे फरार झाले होते.

अखेर अनंत गर्जे रविवारी मध्यरात्री 1 च्या सुमारास स्वतःहून वरळी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. त्यानंतर आज त्याला कोर्टापुढे हजर करण्यात आले. तिथे पोलिसांनी त्याच्या कोठडीची मागणी केली. त्यानुसार कोर्टाने त्याला 27 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. घटना घडली त्यावेळेस मी घरी नव्हतो, घरी पोहोचलो तेव्हा घराचे दरवाजे आतील बाजूने बंद होते. घाबरुन इमारतीच्या 31 व्या मजल्यावरुन खिडकीच्या माध्यमातून मी 30 व्या मजल्यावरील माझ्या घरात प्रवेश केला, तेव्हा गौरी गळफास घेतलेल्या अवस्थेत होती.

# बीडमध्ये ५ वर्षीय चिमुकलीवर बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी, बीड, दि. २४ :

एका 5 वर्षीय चिमुकलीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना बीड जिल्ह्यात समोर आली आहे. विशेष म्हणजे बलात्काराची घटना घडल्यानंतर गावातील काही लोकांनी सदर मुलीला तब्बल 4 दिवस उपचारासाठी जाऊ दिले नाही. तसेच तिच्या आईवरही या प्रकरणी गुन्हा दाखल न करण्यासाठी दबाव टाकला. पण अखेर आपल्या मुलीची वेदना पाहून या महिलेने पोलिस ठाणे गाठून या प्रकरणी गुन्हा दाखल केला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, नाशिक जिल्ह्यातील मालेगावच्या डोंगराळे येथील एका 3 वर्षीय चिमुकलीवर नुकताच बलात्कार व हत्या झाल्याची घटना घडली होती. या घटनेमुळे अवघे समाजमन सुन्न झाले असताना आता बीड जिल्ह्यातही अशीच एक घटना घडली आहे. बीड जिल्ह्यातील ताज्या घटनेत एका 5 वर्षीय लैंगिक अत्याचार झाला आहे. नात्यातीलच एका मुलाने हा घात केला आहे. पीडित मुलीवर सध्या बीड जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. ही घटना गत 11 नोव्हेंबर रोजी घडली. पण ती आज समोर आली.

ही घटना घडल्यानंतर गावातील काही नागरिकांनी पीडित मुलीच्या आईवर गुन्हा दाखल न करण्यासाठी दबाव टाकला. या प्रकरणी बदनामी टाळण्यासाठी त्यांनी चक्क 4 बैठका घेतल्या. या कालावधीत मुलगी तशीच तडफडत आपल्या घरी होती. ग्रामस्थांनी तब्बल 4 दिवस तिला घरीच रोखून धरले. पण मुलीच्या नातलगांना ही गोष्ट कळल्यानंतर त्यांनी थेट पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर वेगाने सूत्रे हालत शिरूर कासार पोलिसांनी गुन्हा दाखल केला. 4 दिवस वेदना असह्य झाल्यानंतर अखेर मुलीच्या आईने उपचारासाठी बीड गाठले. तिथे तिच्यावर उपचार सुरू आहेत. पीडित मातेला झाला प्रकार सांगताना अश्रू अनावर होत होते.

दुसरीकडे, बालकल्याण समितीचे सदस्य तत्वशील कांबळे यांनी या प्रकरणी शिरूर कासार पोलिसांवरही कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेची आपबिती सांगताना पीडित मुलीच्या आईला अश्रू अनावर झाले होते. पोलिसांनी या प्रकरणी पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला पाहिजे. विशेषतः या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई करणाऱ्या शिरूर कासार पोलिसांवरही कारवाई झाली पाहिजे.

## एड्स रुग्णांना उपचार पुरविण्यात महाराष्ट्र देशात अव्वल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

एड्स रुग्णांची काळजी आणि त्यांना उपचार सेवा पुरविण्यासाठी देशातील सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेद्वारे (नॅको) गौरव करण्यात आला आहे. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेच्या राष्ट्रीय आढावा बैठकीत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. आंध्रप्रदेशातील विजयवाडा येथे १२ नोव्हेंबर रोजी झालेल्या केंद्रीय समारंभात महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेला (एमएसएसीएस) या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले. नॅकोच्या काळजी आधार आणि उपचार विभागाच्या प्रमुख डॉ. चिन्मयी दास यांच्या हस्ते हा पुरस्कार एमएसएसीएसचे उपसंचालक डॉ. प्रियांका वाघेला आणि सहाय्यक संचालक प्रदीप सोनवणे यांनी स्वीकारला. हा सन्मान महाराष्ट्राच्या प्रमुख आरोग्य निर्देशांकामधील, विशेषतः एचआयव्हीसह जगणाऱ्यासाठी अँटी रेट्रोव्हायरल थेरपी उपचार सेवा पुरवण्यात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी देण्यात आला आहे. एमएसएसीएसने आपले अव्वल स्थान मिळवले आहे. या केंद्रांनी अनेक महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

# महावितरण राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. २४ :

अमरावती येथे नुकत्याच झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत छ.संभाजीनगर-लातूर-नांदेड परिमंडलाच्या संघाने विविध क्रीडा प्रकारांत ९ सुवर्णपदके व ९ रौप्यपदके पटकावत उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले. तिन्ही परिमंडलातील पदकविजेत्या सर्व कर्मचारी खेळाडूंचा प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने यांच्या यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

महापारेषणच्या सभागृहात झालेल्या सत्कार समारंभास छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कच्छोट, लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, महापारेषणचे मुख्य अभियंता जयंत विके, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, बीना सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती. महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पधेर्तील पदकविजेत्या खेळाडूंसह सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, मुख्य अभियंता पवनकुमार कच्छोट, अरविंद बुलबुले, जयंत विके, मनीष ठाकरे, बीना सावंत आदी.



महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पधेर्तील पदकविजेत्या खेळाडूंसह सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, मुख्य अभियंता पवनकुमार कच्छोट, अरविंद बुलबुले, जयंत विके, मनीष ठाकरे, बीना सावंत आदी.

राज्यस्तरीय स्पर्धेत सांघिक खेळात व्हॉलिबॉलमध्ये राघवेंद्र कापसे, ज्ञानेश्वर गाडेकर, बाळासाहेब ढगे, रियाज शेख, हामिद सय्यद, पवन सूर्यवंशी, फेरोज तांबोळी, गजानन नीलपत्रेवार, परमेश्वर जाधव, किरण वीर, मनोज साळुंके व अमोल साळुंके यांनी सुवर्णपदक पटकावले.

आशिष खानापुरे, रोहन श्रीरामवार, किरण पवार, गजानन राऊत व विशाल साळवे यांच्या चमूने टेबल टेनिसमध्ये सुवर्णपदक पटकावले. बॅडमिंटनमध्ये गुणवंत इप्पर, दीपक नाईकवाडे, रतनसिंग दुकानदार, सय्यद अकबर, ईश्वरसिंग टेलर यांनी रौप्यपदक पटकावले. कॅरममध्ये इक्बाल खान, सचिन केळकर, केशव लटपटे, प्रमोद चौरे व शाम वाघचौरे यांना सुवर्णपदक मिळाले. ब्रिजमध्ये दीपक माने, दिलीप पवार, सतीश गुडे, ललितादास देशपांडे, सुशील ढगे, सत्यम जयस्वाल यांना रौप्यपदक मिळाले.

गोळा फेक - श्रीकांत धोत्रे (सुवर्णपदक), भालाफेक - बालाजी कांबळे (सुवर्णपदक), बुद्धिबळ - पंकज देशमुख (सुवर्णपदक), कुस्तीच्या विविध वजनगटांत मतीन शेख यांनी सुवर्ण तर विजय जगताप, अमोल मुंगळे, बलराज अलाणे व वैभव पवार यांनी रौप्यपदक पटकावले. बॅडमिंटन दुहेरीत दीपक नाईकवाडे व गुणवंत इप्पर यांना रौप्यपदक मिळाले. सहव्यवस्थापकीय संचालक जिवने यांनी खेळाडूंचे अभिनंदन करताना यापुढेही ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर महावितरणचे नाव उंचावतील,

## प्रेमविवाह केल्याच्या रागातून तरुणाच्या वडिलांवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २४ :

नात्यातील तरुणीने प्रेमविवाह केल्याने तरुणाच्या वडिलांच्या डोक्यात गज मारून खुनाचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना लोणी काळभोर भागात घडली. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी आठ जणांना अटक केली.

अरुण छबु सोनवणे (वय ४०, रा. चव्हाण वस्ती, थेऊर, ता. हवेली) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याबाबत चव्हाण यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फियार्दीनुसार आठ जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज दादा शितोळे, शेखर दिलीप चव्हाण, रोशन दिलीप चव्हाण, दिलीप पंडीत चव्हाण, आईनाबाई दिलीप चव्हाण, पूजा दिलीप चव्हाण, मनीषा दादा शितोळे, उज्वला सावंत (सर्व रा. चव्हाण वस्ती, थेऊर, ता. हवेली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनवणे यांच्या मुलाने एका तरुणीशी प्रेमविवाह केला होता. तरुणी आरोपींच्या नात्यातील आहे. तरुणीने प्रेमविवाह केल्यानंतर आरोपी चिडले होते.

शनिवारी (२२ नोव्हेंबर) सकाळी साडेसातच्या सुमारास आरोपी अरुण सोनवणे यांच्या घरासमोर आले. मुलीने प्रेमविवाह केल्याने आरोपींनी चव्हाण यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांना मारहाण केली. त्यानंतर आरोपी शेखर चव्हाण याने सोनवणे यांच्या डोक्यात गज मारला. या घटनेनंतर सोनवणे यांचा मुलगा तेथे आला.

आरोपींनी सोनवणे यांच्या मुलाला मारहाण केली. खुनाचा प्रयत्न, दहशत माजविल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली. पोलीस उपनिरीक्षक बिराजदार तपास करत आहेत.

# २०४७ पर्यंत काँग्रेसला सत्ता नाही : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा माहोल चांगलाच तापला असून सर्वच पक्षांनी जोरदार प्रचारयात्रा, सभा आणि शक्तीप्रदर्शनाला वेग दिला आहे. अशातच आज महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वाशिममध्ये काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. निवडणूक प्रचारासाठी मालेगाव शहरात आलेल्या बावनकुळे यांनी काँग्रेसचे नेतृत्व, अंतर्गत भांडणं आणि विकासाच्या अजेंड्यावर प्रश्न उपस्थित करत महाविकास आघाडीवरही टीकेची झोड उठवली.

आपल्या भाषणात बावनकुळे यांनी असा दावा केला की, 2047 पर्यंतही काँग्रेसला केंद्रात किंवा राज्यात सत्ता मिळणार नाही. कारण काँग्रेसकडे विकासाबाबत स्पष्ट योजना नाही आणि जनतेकडून मिळणारा प्रतिसादही खूप कमी होत आहे.

महाराष्ट्रातील जनतेने 2024 च्या विधानसभा निवडणुकीत भाजप- महायुतीला मिळवून दिलेला पाठिंबा याचे स्पष्ट उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार महायुतीला 3 कोटी 18 लाख मतं



मिळाली तर महाविकास आघाडीला 2 कोटी 18 लाख मतांवर समाधान मानावे लागले. पुढील 2029 मध्येही महायुतीच सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी काँग्रेसमधील अंतर्गत भांडणांवरही त्यांनी जोरदार टीका केली. काँग्रेसमध्ये कुणाचा पाय कुणाच्या पायात बसत नाही, अशी टीका करत त्यांनी अनेक नेत्यांची उदाहरणे दिली. विजय वडेट्टीवार, नाना पटोले, सुनील केदार, यशोमती ठाकूर आणि हर्षवर्धन सपकाळ या नेत्यांमध्ये परस्पर संवाद कमी असून निर्णयप्रक्रियेत समन्वयाचा पूर्ण अभाव आहे, असे ते म्हणाले. या विसंवादामुळेच काँग्रेस कमजोर होत चालली आहे आणि भविष्यात ही पार्टी किंचित पार्टी म्हणूनच ओळखली जाईल, असा दावा त्यांनी केला.

भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या एका काँग्रेस कार्यकर्त्याचा उल्लेख करत बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसमध्ये रोज भांडणं, गटबाजी आणि फूट दिसते. त्यामुळे कार्यकर्ते नाराज होऊन पक्ष सोडत आहेत. तर दुसरीकडे महायुती सरकार राज्याच्या विकासासाठी सातत्याने काम करत आहे. विकासकामांच्या जोरावर लोकांचा विश्वास भाजपवर वाढत असून येत्या काळात हा विश्वास अजून दृढ होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. भाजप महायुती सरकार आगामी काळात अनेक मोठी प्रकल्प, उद्योग आणि सुविधा राज्यात आणणार आहे. त्यामुळे 2029 पर्यंत काँग्रेसचं अस्तित्व आणखी लहान होईल, असेही ते म्हणाले.

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा आज स्मृतिदिन. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले.

महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली.

१९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्वल केले.

यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, प्रवासवर्णन, स्फूटलेखन, वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख, पत्रलेखन भाषणे, इत्यादी स्वरूपात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे.

महासागर

मंगळवार, दि. 25 नोव्हेंबर 2025

अमरावती



# नकली सोने गहाण ठेवून फसवणूक करणारे जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणची मोठी कारवाई



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 24)** सराफा व्यापा?यांची नकली सोन्याच्या दागिन्यांच्या माध्यमातून फसवणूक करणाऱ्या दोन सराईत आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी, परतवाडा, अचलपूर, दर्यापूर, चांदूर रेल्वे आणि चांदूरबाजार परिसरात या दोघांनी तब्बल नऊ फसवणुकीच्या घटना घडवल्या असल्याचा उलगडा झाला आहे.

प्रिन्स अग्रवाल यांनी 22 नोव्हेंबर रोजी अंजनगाव सुर्जी पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत सांगितले की, एका अनोळखी व्यक्तीने नकली सोन्याच्या बांगड्या तारण ठेवून 3.5 लाख रुपये घेऊन फसवणूक केली. यापूर्वीही त्याच व्यक्तीने नकली सोन्याचे पोत ठेवून 1.10 लाख रुपये घेतले होते. शिवाय दीपाली ज्वेलर्स, पल्लवी ज्वेलर्स आदी दुकानांतूनही अशाच पद्धतीने एकूण 6.90 लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य पाहता जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले. तांत्रिक पुरावे व गोपनीय माहितीच्या आधारे जयस्तंभ चौक, दर्यापूर सराफा बाजार परिसरात दोघे संशयित फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत दोघांनी गुन्ह्यांची कबुली दिली. गोविंदा गोपाळराव लोखंडे (35, रा. आष्टी, ता. भातकुली), मनोहर बंबकराव दुधाने (41, रा. आदर्श नगर, नागपूर) अशी आरोपींची नावे असून, या दोघांनी प्रत्येकी 10 ग्रॅम दागिन्यांमध्ये फक्त 2 ग्रॅम खरे सोने वापरून उर्वरित धातूपासून पोत, अंगठ्या, बांगड्या इत्यादी दागिने तयार करून ते पूर्णपणे खरे असल्याचे भासवून तारण ठेवण्याची कबुली दिली. अटक केलेल्या आरोपींकडून 6,09,600 रुपये रोख, विनाक्रमांक युनिकॉर्न मोपेड, चार अँड्रॉइड मोबाईल व नकली सोन्याचे दागिने, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### नऊ गुन्ह्यांची कबुली

आरोपींनी जिल्ह्याभरात केलेल्या नऊ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. संपूर्ण मुद्देमाल आणि आरोपी पुढील कारवाईसाठी अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्याकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलिस निरीक्षक किरण वानखेडे, पीएसआय नितीन इंगोले, तसेच स्थानिक गुन्हे शाखा व अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे पथक यांचा विशेष सहभाग होता. अमरावती पोलिसांनी नागरिकांना सावध करत नकली सोन्याच्या तारण फसवणुकीपासून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# निष्काळजी वाहनचालकामुळे कामगार ठार

## सातूर्णा एमआयडीसी स्थित मनपा पार्किंग यार्डात घटना

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 24)** – सातूर्णा एमआयडीसी परिसरातील मनपा पार्किंग यार्डमध्ये दोन कचरा कन्टेनर वाहनाच्या मधात दबून एक कामगार ठार झाला. संजय अंबादास राऊत (वय 55, रा. खो. गेट झोपडपट्टी, भातकुली रोड) असे मृताचे नाव आहे. ही घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली.

वाहन चालकाने निष्काळजीपणे वाहन रिव्हर्स घेतल्यानंतर 55 वर्षीय कामगार संजय हा मागील वाहनावर आदळला आणि दोन्ही वाहनात दबून, त्याचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणात राजापेठ पोलिसांनी वाहन चालक अतुल तायडे (वय 35, रा. लक्ष्मी नगर) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

अमरावती शहरातील कचरा गोळा करणारे कन्टेनर हे सातुर्णा एमआयडीसीतील पार्किंग यार्डमध्ये उभी केली जातात. सोमवारी सकाळी सुमारे 9.45 वाजता पार्किंग यार्डात नियमीत काम सुरू असताना एमएचक्ष्27 बीएक्स 0238 या क्रमांकाचा वाहन चालक तायडे याने बेजबाबदारपणे वाहन रिव्हर्स चालवताना मागे कोण आहे याची कोणतीही खबरदारी घेतली नाही. त्याच वेळी मागे काम करत असलेले संजय अंबादास राऊत (वय 55, रा. खो. गेट झोपडपट्टी, भातकुली रोड) वाहनाखाली चिरडला गेले. या घटनेनंतर संजयला जखमा गंभीर असल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर तेथे उपस्थित कर्मचार्यांनी तत्काळ संजयला जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. परंतू डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले. मृतकाचा मुलगा प्रणय राऊत यांनी दिलेल्या जबानीवरून राजापेठ पोलिसांनी तात्काळ आरोपी वाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल केला.

# इच्छुक उमेदवार सोशल मीडियावर ॲक्टीव्ह

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 24)** तब्बल तीन वर्षानंतर महानगरपालिकेच्या होऊ घातलेल्या निवडणुकांवर पुन्हा एकदा ओबीसी आरक्षणाची टांगती तलवार असली तरी गुडघ्याला बाशिंग बांधून असलेले इच्छुक उमेदवार मात्र कामाला लागले आहेत. प्रभागाचे आरक्षण घोषित होताच इच्छुकांनी तयारी सुरु केली आहे. शहरात तुफान बॅनरबाजी सुरु असून जो–तो प्रभागातून मीच उमेदवार असा दावा करुन कामाला लागला आहे.

एकीकडे शहर सौदर्याकरणाच्या दृष्टीने महापालिका प्रशासन होर्डिंग, बॅनर मुक्त शहर बनविण्यासाठी धडपड करित आहे तर दुसरीकडे निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षाचे इच्छुक उमेदवार मात्र मनपा प्रशासनाच्या या प्रयत्नावर पाणी फेरताना दिसत आहेत. महापालिका निवडणुकीचे आरक्षण घोषित होताच राजकीय वातावरणात बदल झालेला दिसून येत आहे. नवीन आरक्षणामुळे काहींचे चेहरे पडले तर काहींनी नव्या प्रभागात संधी निर्माण करण्याची तयारी सुरु केली आहे. ओबीसी, महिला आणि अनुसूचित जाती प्रवर्गातील आरक्षणामुळे गणिते बदलल्याची चर्चा आहे. महापालिका निवडणूक जरी लांबणीवर पडण्याची शक्यता असली तरी माजी नगरसेवकांसोबत इच्छुकांचे बॅनर प्रभागात झळकू लागले आहेत. दुसरीकडे माजी नगरसेवक प्रतिष्ठान, वाढदिवस, कार्यक्रम किंवा सार्वजनिक उपक्रमांच्या निमित्ताने बॅनरबाजी करतांना दिसून येत आहेत. काही प्रभागांमध्ये तर दर आठवड्याला एक नवीन पोस्टर लावले जात आहे, त्यामुळे राजकीय स्पर्धेला आता पोस्टर वॉरचे स्वरुप येत असल्याचे दिसून येत आहे.



### प्रत्येकांचे बनले वॉट्सअॅप ग्रुप

पूर्वी इच्छुकांसोबत नगरसेवक डोअर टू डोअर सकाळी फेरफटका मारून नागरिकांसोबत चर्चा करीत होते. नागरिकांच्या समस्या समजून घेत होते. आता त्या सोबतच त्यांचा मोबाईल नंबर घेत प्रभाग क्रमांकांच्या नावाचा वॉटसअॅप ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपमध्ये नगरातील अधिकाधिक नागरिकांचा समावेश करुन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या जात आहे.

### रील्सचे फॅड वाढले

कमी वेळात अधिक मतदारांपर्यंत पोहोचण्याचे ठिकाण म्हणजे सोशल मीडिया, यामुळे इच्छुकांसोबत आता माजी नगरसेवकांनीसुध्दा रील्स बनविणे सुरु केले आहे. सोशल मीडियावर या रिल्सची संख्या वाढल्याचे दिसून येते. कुठे ही भेट दिली तरी त्याची रिल्स बनविणे आणि सोशल मीडियावर प्रसारित करण्याचे प्रकार वाढल्याने सोशल मीडियावर तेच ते बघायला मिळत आहे.

### तरुण चाकूसह जेरबंद

**अमरावती** – गाडगेनगर पोलिस स्टेशन हद्दीतील विलास नगर परिसरात सेंट्रल वेअरहाऊसजवळ अंधारात संशयास्पदरीत्या लपून बसलेला दावित मनोहरे (वय 32, रा. भीमनगर, अमरावती) याला रविवारी पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून चाकू जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी मनोहरेविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# घरात शिरून मोबाइल व मंगळसुत्राची चोरी

## साबनपुरा परिसरातील घटना

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 24)** खोलापुरीगेट पोलिस ठाणे हद्दीत येणाऱ्या साबनपुरा परिसरात भरदिवसा घरात शिरून मोबाइल आणि सोनेचे मंगळसूत्र चोरी करण्याची घटना 22 नोव्हेंबर रोजी सकाळी 8.40 वाजता घडली. घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात आरोपी युवतीचे स्पष्ट चित्र कैद झाले आहे. याप्रकरणी सैय्यद जफर सैय्यद नजीमोद्दीन (38) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात युवतीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सैय्यद जफर नेहमीप्रमाणे सकाळी झोपेतून उठले आणि त्यांनी आपला मोबाइल ठेवलेल्या जागी पाहिले, मात्र मोबाइल दिसला नाही. त्यानंतर त्यांच्या आईने टेबलवर ठेवलेले सोनेचे मंगळसूत्रही गायब झाल्याचे निदर्शनास आले. चोरीची शंका आल्याने घरात बसवलेल्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता गुलाबी जॅकेट परिधान केलेली एक तरुणी घरात प्रवेश करून जाताना हातात मोबाइल घेऊन जाताना दिसत होती. या घटनेनंतर सैय्यद जफर यांनी खोलापुरीगेट पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात युवतीविरुद्ध गुन्हा नोंदवून अधिक तपास सुरू केला आहे.



# टाकरखेडा संभू पुलावर स्पीड ब्रेकरला पट्ट्यांचा अभाव

## अपघातांचा धोका वाढला

महासागर | प्रतिनिधी

**टाकरखेडा संभू (दि. 24)** –टाकरखेडा संभू पुलावरील तीन स्पीड ब्रेकरवर कोणत्याही प्रकारच्या रेडियम पट्ट्या नसल्याने वाहनचालकांना हे स्पीड ब्रेकर वेळेत दिसत नाहीत. विशेषत- नवीन गाडी चालकांना या अदृश्य स्पीड ब्रेकरचा अंदाज न आल्याने लहान–मोठे अपघात होत आहेत, अशी स्थानिक नागरिकांकडून माहिती मिळत आहे.

या परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत असून, बांधकाम विभागाने तत्काळ स्पीड ब्रेकरवर रेडियम पट्ट्या लावाव्यात, अशी नागरिकांची आग्रही मागणी आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, रेडियम पट्ट्या लावल्यास रात्रीच्या वेळीही स्पीड ब्रेकर स्पष्ट दिसतील आणि अपघातांना प्रतिबंध होईल. स्थानिकांनी संबंधित विभागाला अर्जंट कारवाईची विनंती केली असून, जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरित लक्ष देणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

# किराणा दुकानदाराच्या गळ्यातील सोन्याची चेन लंपास

- तीन अज्ञात आरोपींची धाडसी चोरी
- वरुड पोलिसात गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 24)** – खरेदीचा बहाणा करून तीन अज्ञात युवकांनी किराणा दुकानदाराच्या गळ्यातील सुमारे 20 ग्रॅम सोन्याची चेन हिसकावून पलायन केल्याची धक्कादायक घटना वरुड तालुक्यातील जरुड येथील वार्ड क्र. 6 मध्ये रविवारी दुपारी घडली. या प्रकरणी सतीश रामदास दारोकर (वय 54) यांच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी अज्ञात तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रोजच्या प्रमाणे सतीश दारोकर यांनी 23 नोव्हेंबर रोजी आपले किराणा दुकान उघडले होते. दुपारी सुमारे 12 ते 12.30 वाजताच्या सुमारास नंबर प्लेट नसलेल्या मोटारसायकलवरून तीन युवक दुकानासमोर आले. त्यापैकी दोन युवक दुकानात आले, तर तिसरा बाहेरच उभा राहिला. दुकानात आलेल्या युवकांनी किराणा साहित्य खरेदी केले व पैसे पत्नी देईल असे सांगत सतीश दारोकर यांच्या जवळ गेले. याच क्षणी एका आरोपीने अचानक गळ्यावर झडप घालत सुमारे 20 ग्रॅम वजनाची अंदाजे 2 लाख रुपये किमतीची सोन्याची चेन हिसकावली आणि तिघेही मोटारसायकलवर बसून क्षणार्धात पसार झाले. दिवसाढवळ्या गावाच्या चौकात घडलेल्या धाडसी चोरीमुळे नागरिकांमध्ये भय व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेने परिसरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. या प्रकरणी सतीश दारोकर यांनी वरुड पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात तीन आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करत पुढील तपास सुरू केला आहे.

# आतापर्यंत 125 नागरिकांचे आक्षेप व हरकती

## नागरिकांनी प्रारूप मतदार यादीत नाव तपासावे – आयुक्त सौम्या शर्मा चांडक

### अमरावती महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक

**अमरावती, (दि. 24)** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–2025 च्या पार्श्वभूमीवर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांनी आपले नाव यादीत आहे की नाही याची खात्री करावी, असे आवाहन आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे. यादी जाहीर झाल्यापासून आतापर्यंत 125 नागरिकांनी आक्षेप व हरकती नोंदवल्या आहे. त्यावर आवश्यक कार्यवाही सुरू आहे. अशी माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.



1 जुलै 2025 रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागानुसार पुनर्विभाजन करून प्रभाग क्रमांक 1 ते 22 साठी स्वतंत्र प्रारूप यादी 20 नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आली आहे. ही मतदार यादी amravaticorporation.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे.

### नागरिकांसाठी पाहणीची सोय

प्रारूप मतदार यादीची छापील प्रत नागरिकांच्या पाहणीकरीता मुख्य कार्यालय, महानगरपालिका, अमरावती तसेच प्रभाग निहाय झोन 1 – रामपुरी कॅम्प, झोन 2 राजापेठ, झोन 3 दस्तुरनगर, झोन 4 बडनेरा, झोन 5 भाजीबाजार

27 नोव्हेंबरपर्यंत हरकत दाखल करण्याची अंतिम मुदत नागरिकांनी https://mahasecvoterlist.in/ या संकेतस्थळावर आपले नाव ऑनलाईनही शोधता येईल. ज्यांच्या भागात व वार्डमध्ये राहतात त्या प्रभागाच्या यादीत नाव असल्याची खात्री प्रत्येकाने करून घ्यावी. यादीत नाव नसल्यास किंवा माहिती चुकीची असल्यास 27 नोव्हेंबर 2025 रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत महानगरपालिका निवडणूक विभाग, अमरावती येथे संपर्क साधून हरकत/आक्षेप नोंदवता येतील. नागरिकांचा एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, असा उद्देश महापालिकेने यामागे व्यक्त केला आहे.



### महिलेचा विनयभंग

**अमरावती** – चिखलदरा येथील 22 वर्षीय महिला शेतात जर्दाळूच्या शेंगा तोडत असताना आरोपी तेजिलाल कासदेकरने तिचा विनयभंग केला. महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी रविवारी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला.

# जुगार अड्ड्यावर धाड, आठ जणांना पकडले

**अमरावती** – नागपुरी गेट पोलिसांनी रविवारी जुगार खेळत असलेल्या 8 जणांना रंगेहात पकडले. पकडण्यात आलेल्यांमध्ये रज्जाक मोल्ला, मुस्ताक मोल्ला (39, अलीम नगर), नियामत गाझी, विशे गाझी (38, अकबर नगर), मयदुल मंडल, माजिद मंडल (35, अलीम नगर) तसेच गासोद्दीन मंडोल आणि मकसूर मंडोल (30, अलीम नगर) यांचा समावेश आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून 1,930 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. पुढिल तपास नागपूरी गेट पोलिस करीत आहे.

# निलंबनाविरोधात महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा दोन दिवसांचा संप



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 24)** – अमरावती महानगरपालिकेत अग्निशमन दलातील कर्मचाऱ्याच्या आत्महत्येनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीने तापलेले वातावरण सोमवारपासून आणखी तीव्र झाले. विभागातील दोन अधिकाऱ्यांच्या निलंबनाविरोधात महानगरपालिका कर्मचारी–कामगार संघटना रस्त्यावर उतरली असून दोन दिवसांचा संप पुकारण्यात आला आहे.

अग्निशमन दलाचे कर्मचारी राजेश मोहन यांच्या आत्महत्येनंतर महानगरपालिका प्रशासनाने घेतलेल्या कारवाईविरोधात कर्मचारी संघटना आक्रमक झाली आहे. राजेश मोहन यांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी अग्निशमन विभागाचे प्रभारी अधीक्षक संतोष केंद्रे आणि अभियंता लक्ष्मण पावडे यांना निलंबित केले. या कारवाईला निषेध म्हणून कर्मचारी–कामगार संघटनेने सोमवारी दोन दिवसांचा संप जाहीर केला.

सकाळपासूनच संघटनेचे अधिकारी आणि कर्मचारी महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर जमा झाले व घोषणाबाजी करत निषेध नोंदवला. आंदोलनादरम्यान अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त भूषण पुसटकर, शहर अभियंता रवींद्र पवार तसेच इतर अधिकारीही उपस्थित होते. संघटनेच्या शिष्टमंडळाने महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन निलंबित दोनही अधिकाऱ्यांना तत्काळ कामावर घेण्याची मागणी केली. तसेच या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्फत करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, निलंबित अधिकाऱ्यांवर करण्यात आलेली कारवाई अन्यायकारक असून वस्तुस्थितीची चौकशी न करता घेतलेल्या निर्णयाला कर्मचारीवर्गाने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. दोन दिवसांचा संप सुरू असल्याने महानगरपालिकेच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# मोर्शीत बँकांचा संत्रा फळ पीक विमा घेण्यास नकार!

## शेतकरी विरोधी कृत्य करणाऱ्या बँकांवर कार्यवाही करण्याची मागणी! | राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आंदोलनाचा ईशारा!

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी (दि. 24)** – मोर्शी तालुक्यातील विविध बँका संत्रा पिकाचा फळ पिक विमा काढण्यास नकार देत आहे. त्यामुळे तालुक्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकरी हवामानावर आधारित फळ पिक विमा व गारपिट विमा योजनेपासून वंचित राहत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा विमा न काढणाऱ्या शेतकरी विरोधी बँकांवर कार्यवाही करून बँकांना फळ पिक विमा काढण्याचे निर्देश देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे.




मोर्शी तालुक्यामध्ये 25 हजार हेक्टर क्षेत्रावर विक्रमी संत्रा फळ पिक घेतले जात असून हजारो हेक्टर क्षेत्राचा फळ पिक विमा तालुक्यातील शेतकरी काढतात. मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी संत्रा पिकांना संरक्षण कवच म्हणून फळ पिक विमा भरण्यास सुरुवात केली असून हवामानावर आधारित गारपिट विमा हा फक्त बँकेमधूनच काढता येतो तो बाहेर सीएससी केंद्रांवर काढता येत नसल्यामुळे फळ पिक विमा व गारपीट विमा भरण्याची अंतिम तारीख 30 नोव्हेंबर 2025 आहे. मात्र मोर्शी तालुक्यातील बँकानी शासन आदेशाला केराची टोपली दाखवत संत्रा पिकाचा फळ पीक विमा घेण्यास शेतकऱ्यांना नकार दिल्याने मोर्शी तालुक्यातील 25 हजार हेक्टर क्षेत्रावरील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकरी हैराण झाले आहे. मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकरी तालुक्यातील बँक उघडल्यानतंर पीक विमा भरून घेण्यासाठी बँकेत गेले असता त्या ठिकाणी बँकेतील कर्मचाऱ्यांनी पीक विमा भरल्या जाणार नाही असे म्हणून धुडकावून लावतात त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांची निराशा होत असून बँकांप्रती रोष निर्माण होत आहे. 31 नोव्हेंबर ही फळ पीक विमा भरण्याची अंतिम तारीख असल्यामुळे शेतकऱ्यांजवळ फक्त 5 दिवस शिल्लक असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी बँकासमोर गर्दी करुन विमा भरुन घेण्यास विनंती करीत आहे. तरीसुद्धा मोर्शी येथील भारतीय स्टेट बँक व तालुक्यातील इतर सर्व बँका फळ पिक विमा काढण्यास नकार देत आल्यामुळे शेतकरी विरोधी कृत्य करणाऱ्या बँकांवर कार्यवाही करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अन्यथा शेतकऱ्यांना फळ पिक विमा गारपिट विम्यापासून वंचित ठेवणाऱ्या बँकांवरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शासनाला दिला आहे.

# धामणगाव रेल्वे पंचायत समिती अंतर्गम टेंडरिंग घोटाळा

## हिंगणगाव ग्रामपंचायत सचिवांच्या चौकशीची मागणी







महासागर | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे,( दि. 24 )** – धामणगाव रेल्वे पंचायत समिती अंतर्गत विविध ग्रामविकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. विशेषत: हिंगणगाव ग्रामपंचायतीत विकासकामांच्या निविदा प्रक्रियेत मोठ्या अनियमितता झाल्याचा ग्रामस्थांनी आरोप करत तात्काळ चौकशीची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायतींमध्ये 'मॅनेज' टेंडरिंगची पद्धत राबवली जात असून काही ठराविक ठेकेदारांना लाभ मिळावा म्हणून निविदा अगोदरच ठरवून देण्यात येत असल्याचे आरोप आहेत. जाहिरात न काढता किंवा अपूर्ण माहिती देऊन निविदा प्रक्रिया राबवणे, खुल्या स्पर्धेला बगल देणे आणि खाजगी संगनमतातून टेंडर मंजूर करणे अशा प्रकारांनी शासनाची फसवणूक झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

### विकास कामांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

हिंगणगावसह अनेक ग्रामपंचायतीतही विकासकामांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. हिंगणगाव येथे काही कामांचे प्रत्यक्ष तपासणीपूर्वीच ठेकेदारांना संपूर्ण रक्कम अदा केल्याचे समोर आले आहे. अनेक कामे कागदोपत्री दाखवली असली तरी प्रत्यक्षात ती अपूर्ण असल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामस्थांनी संपूर्ण टेंडरिंग प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करून संबंधित सचिव व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे पंचायत समितीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाकडून पुढील पावले काय उचलली जातात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चिंचोली येथे अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला



महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट,( दि.24 )** – चिंचोली परिसरात अवैध रेती वाहतुकीवर अंकुश लावण्यासाठी तहसील प्रशासनाने केलेल्या संयुक्त कारवाईत अवैध गौण खनिज वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. ही कारवाई आज सोमवार(दि.24) ला सकाळी सुमारे 9 वाजता तहसीलदार अभय घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

मौजा चिंचोली येथे गस्तीदरम्यान एमएच 32/ पी 0282 क्रमांकाचा ट्रॅक्टर रेतीची अवैध वाहतूक करताना गौण खनिज पथकाला आढळून आला. पथकाने ट्रॅक्टर थांबवून चालक राजू मारोती नारंवरे (रा. चिंचोली) यांच्याकडे रेती वाहतुकीचा अधिकृत परवाना मागितला असता, त्यांच्या जवळ कोणतीही वैध कागदपत्रे आढळून आली नाहीत. तपासाअंती ट्रॅक्टर हा सतीश अडकणे (रा. चिंचोली) यांच्या मालकीचा असल्याचे समोर आले. संबंधित रेती ही चिंचोली घाटातून चिंचोली गावात नेली जात असल्याची माहिती चालकाकडून मिळाली. घटनास्थळी पंचांच्या उपस्थितीत ट्रॅक्टर व रेतीचा पंचनामा करण्यात आला. त्यानंतर दंडात्मक कारवाईसाठी ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे. या कारवाईत तहसीलदार अभय घोरपडे, मंडळ अधिकारी नरेश उईके, ग्राम महसूल अधिकारी विनोद मस्के, सागर भांडवले तसेच कोतवाल संजय इरपाते उपस्थित होते.

# अपंग व्यक्तींचा अपमान करणे, धमकावणे हा अजामीनपात्र गुन्हा

## विशेष न्यायालये आणि कडक शिक्षा लागू

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.24 )** – अपंग व्यक्तींचा अपमान करणे, धमकावणे किंवा त्यांच्यावर कोणताही अत्याचार करणे हा 'अपंग व्यक्तींच्या हक्क कायदा, 2016 'नुसार अजामीनपात्र गुन्हा आहे. या कायद्यातील कलम 89, 92 आणि 93 अंतर्गत अशा गुन्ह्यांसाठी सहा महिने ते पाच वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची तरतूद असून कठोर दंडाची शिक्षाही लागू शकते.

अपंग नागरिकांच्या हक्कांचे रक्षण आणि त्यांच्या प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात विशेष न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या संमतीने ही न्यायालये सत्र न्यायालयात कार्यरत राहतील. खटल्यांसाठी सात वर्षांचा अनुभव असलेल्या विशेष सरकारी वकिलांची नियुक्ती केली जाणार आहे. कायद्यानुसार, अपंग व्यक्तीला ढकलणे, हल्ला करणे, धमकी देणे, अश्लील टिप्पणी करणे, त्यांच्यासोबत अन्न-पाणी वाटण्यास मुद्दाम नकार देणे, सहाय्यक उपकरणांचे नुकसान करणे, तसेच अपंग मुले व महिलांवरील लैंगिक शोषण ही सर्व कृत्ये गंभीर गुन्हे मानली जातील. अपंग महिलेच्या संमतीशिवाय गर्भपात करणेही दंडनीय अपराध ठरवण्यात आला आहे. अपंग कल्याण मंत्रालयाचे सचिव तुकाराम मुंढे (आयएएस) यांनी अलीकडेच जारी केलेल्या पत्रात जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांना दिव्यांग व्यक्तींवरील हिंसाचार व गैरवर्तन रोखण्यासाठी थेट कठोर कारवाईचे अधिकार दिल्याचे नमूद केले आहे. दिव्यांग व्यक्ती हे समाजाचे समान नागरिक असून त्यांचे संरक्षण करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### वरुडमध्ये बंद घरातून 2 लाखांचा ऐवज चोरी

**अमरावती** – वरुड पोलीस ठाणे हद्दीतील शंकुतला विहार परिसरातील बंद घराला चोरट्यांनी लक्ष्य करत आलमारी फोडून सोने-चांदीचे दागिने असा एकूण 2 लाख 4 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

# अक्षय काळमेघ यांचा नितीन गडकरी यांच्या हस्ते सन्मान

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.24 )** – नागपूर येथे सुरू असलेल्या मध्य भारतातील सर्वात मोठ्या 'अग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनीत अंजनगाव तालुक्यातील जिजाऊ कल्टीव्हेटर प्रोड्युसर कंपनी चे अध्यक्ष अक्षय काळमेघ यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते विशेष सन्मान प्रदान करण्यात आला.




कृषी उद्योग क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कार्य, सेंद्रिय शेतीला दिलेले प्रोत्साहन आणि शेतकरी उत्पादने बाजारपेठेशी जोडण्याच्या उपक्रमांची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली कंपनीने अल्पावधीत लक्षणीय प्रगती साधत अनेक शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून दिला आहे. हा सन्मान अंजनगाव तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे.

### पूजा वाघ यांची नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीतून माघार

**चांदूर रेल्वे** – काँग्रेसने तिकीट नाकारल्यानंतर अपक्ष म्हणून उभ्या राहिलेल्या पूजा हर्षल वाघ यांनी अखेर उमेदवारी मागे घेतली. पत्रकार परिषदेत त्यांनी 'आपलं चांदूर' पॅनल आणि नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रियंका विश्वकर्मा यांना पाठिंबा जाहीर केला. काँग्रेस नेते हर्षल वाघ व माजी पाणीपुरवठा सभापती महेश कलावटे यांनीही पॅनलला समर्थन दिले. या परिषदेत निलेश विश्वकर्मा, गणेश रॉय, पांडुरंग डोंगरे आदींसह पॅनलचे उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आला हिवाळा, तब्येत सांभाळा...

## आरोग्य विभागाचे नागरिकांना आवाहन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, दि. 24** – हिवाळ्याच्या सुरुवातीपासून तापमानात मोठी घट होत असून हवेत आर्द्रताही कमी झाल्याने अनेक आजारांचे प्रमाण वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वच्छता, आहार आणि वैयक्तिक आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.



हिवाळ्यात सर्दी, फ्लू, नोरोव्हायरसजन्य गॅस्ट्रोएन्टेरायटिस, ब्रॉन्कायटिस आणि न्यूमोनिया हे आजार सर्वाधिक पाहायला मिळतात. थंडीमुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होत असल्याने लहान मुले, वृद्ध आणि अस्थमा-हृदयविकार असलेल्या व्यक्तींना अधिक धोका असतो. सर्दी-खोकला, ताप, शिंका, अंगदुखी, कफ, श्वसन त्रास, उलट्या-अतिसार यांसारखी लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रतिबंधात्मक उपायांमध्ये हात स्वच्छ धुणे, आजारी व्यक्तींच्या संपर्कापासून दूर राहणे, संतुलित आहार आणि पुरेशी झोप घेणे, खोकताना तोंड-नाक झाकणे, भरपूर पाणी पिणे, पृष्ठभागांची स्वच्छता राखणे, चेहऱ्याला हात न लावणे आणि धुरापासून दूर राहणे यांचा समावेश आहे.

आजारी असल्यास सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. हिवाळ्यातील संसर्गजन्य आजारांपासून बचावासाठी या साध्या सवयी अत्यंत उपयुक्त ठरतात. नागरिकांनी काळजी घेऊन स्वत:चे तसेच कुटुंबाचे आरोग्य जपावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेंद्र आसोले यांनी केले आहे.

### तेल काढणी युनिटसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती,( दि.24 )** – राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत तेल काढणी युनिटसाठी अनुदान योजनेचे अर्ज 30 नोव्हेंबरपर्यंत स्वीकारले जाणार आहेत. शेतकरी उत्पादक संस्था, कंपन्या व सहकारी संस्था 10 टन क्षमतेच्या युनिटसाठी अर्ज करू शकतात. यासाठी प्रकल्प खर्चाच्या 33 टक्के किंवा कमाल 9.90 लाख रुपयांपर्यंत अनुदान मिळणार आहे. ऑईल मिल व एक्सपेलरचे मॉडेल सीपेट, लुधियाना किंवा तत्सम केंद्रीय संस्थांनी प्रमाणित असणे आवश्यक आहे. ही योजना बँक कर्जाशी निगडित असून प्रकल्प मंजूर झाल्यावरच लाभ मिळेल. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# रब्बी हंगाम 2025 : पिकस्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.24 )** – राज्यातील अन्नधान्य, कडधान्य आणि गळीतधान्य पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी विभागाने 'राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना' राबविली आहे. प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब वाढावा हा उद्देश या स्पर्धेमागे आहे. विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. रब्बी हंगाम 2025 मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या पाच पिकांसाठी स्पर्धा ठेवण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकरी हा स्वत:च्या नावे असलेल्या आणि स्वत: कसत असलेल्या जमिनीवर किमान 40 आर क्षेत्रात सलग पीक घेतलेले असणे आवश्यक आहे. शेतकरी एकापेक्षा जास्त पिकांसाठीही स्पर्धेत भाग घेऊ शकतात. अर्जासोबत प्रपत्र-अ, प्रवेश शुल्काचे चलन, 7/12 आणि 8-अ उतारा, बँक खात्याची प्रत तसेच आवश्यक असल्यास जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख 31 डिसेंबर 2024आहे. स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटाचे प्रवेश शुल्क 300 रुपये तर आदिवासी गटाचे 150 रुपये आहे. तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर विजेत्यांना 2 हजार ते 50 हजार रुपयांपर्यंत बक्षिसे दिली जातील. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी किंवा www.krishi.maharashtra.gov.in] (http:// www.krishi.maharashtra.gov.in ) संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले.

# स्वाभिमानी लोककलाकाराचे निधन

**वरूड तालुक्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात चटका लावणारी घटना**

महासागर | प्रतिनिधी



**वरूड, ( दि. 24 )**– वरूड तालुक्याच्या मातीला तिची ओळख देणाऱ्या लोककलावंतांपैकी एक असे शांत, नम्र आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे शामराव मनीराम आहाके (वय 68). सोमवार, दि. 24 नोव्हेंबर 2025 रोजी त्यांचे निधन झाले आणि तालुक्यातील लोककलेचा एक तेजस्वी दिवा कायमचा मालवला.

परंपरा, साधेपणा आणि कलाभक्ती यांचा संगम असलेल्या या भूमीला शामराव आहाके यांनी आपल्या अनोख्या कौशल्याने समृद्ध केले. लाकडाला जीवदान देण्याच्या त्यांच्या कला-अभ्यासाने त्यांना स्वतंत्र ओळख मिळवून दिली. आजच्या यंत्रयुगात हस्तकलेला झाकोळले जात असतानाही त्यांनी चिकाटी, संयम आणि निष्ठेने लाकडी कलाकुसरीची परंपरा जिवंत ठेवली. त्यांच्या हातून घडलेले बैलजोडी, प्राणी-पक्ष्यांच्या मूर्ती, घरगुती उपयोगी वस्तू या केवळ कलाकृती नव्हत्या, तर त्यांनी जगलेल्या कष्टाळू आणि संस्कृतीशी नातं जपणाऱ्या आयुष्याच्या आठवणी होत्या. मुसळखेडा येथे असलेल्या यशवंत बाबा महाराज यांच्या दोन लाकडी मूर्ती आणि रेंगी या त्यांच्या अद्वितीय प्रतिभेची साक्ष देणाऱ्या कलाकृती आजही पाहणाऱ्याला मंत्रमुग्ध करतात. त्यांच्या जाण्याने लोककलेचा एक मार्गदर्शक, आदिवासी समाजातील एक समंजस ज्येष्ठ आणि संयमी कलाकार हरपला आहे. एक पिढी बदलल्याची पोकळी तालुक्याच्या संस्कृतीला भासू लागली आहे. आहाके यांचे अंतिम संस्कार मंगळवार, दि. 25 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता कारली (ता. वरूड) येथे होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, तीन मुले, सुना, नातवंडे आणि मोठा आप्तेष्ट परिवार आहे.

# मोर्शी नगरपरिषदेत तिरंगी लढत

**वार्तापत्र**
**अंबादास सिनकर, मोर्शी**
**भ्रमणध्वनी क्रमांक-9860239421**

मोर्शी नगरपरिषद निवडणुकीत यंदा तिरंगी लढत निश्चित झाली आहे. महायुती, महाविकास आघाडी आणि स्थानिक नगर विकास आघाडी यांनी बाराही प्रभागांत उमेदवार उतरवून निवडणुकीला चुरस आली आहे. अनेक वर्षांनंतर नव्या संघटनांचा सहभाग वाढल्याने स्थानिक राजकारणात बदलते समीकरण दिसत आहे.

गेल्या काही वर्षांपासून विविध स्थानिक प्रश्नांवर आवाज उठवणारे आणि जनसंपर्क ठेवणारे काही प्रभावी सामाजिक गट देखील या निवडणुकीत सक्रिय झाले आहेत. त्यामुळे अनेक प्रभागांत सरळ लढतीपेक्षा तिरंगी स्पर्धा पाहायला मिळणार आहे.

सत्ताधारी महायुतीत जागावाटपावरून निर्माण झालेल्या नाराजीनंतरही या पॅनेलने सर्व 12 प्रभागांत उमेदवारी जाहीर केली आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस व राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांनी एकत्रितपणे उमेदवार उभे करत मोर्चेबांधणी मजबूत केली आहे. विधानसभा पातळीवर तयार झालेली मतयंत्रणा आघाडीसाठी फायदेशीर ठरू शकते,




अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

काही प्रभागांत आघाड्यांतील अंतर्गत मतभेदांचे परिणाम दिसू लागले असून स्वतंत्र व तिसऱ्या आघाडीतूनही उमेदवारांचे प्रमाण वाढले आहे. स्थानिक नागरी प्रश्न, विकासकामे, कर वाढ, पाणीपुरवठा आणि रस्त्यांच्या स्थिती यांसारखे मुद्दे या निवडणुकीत ठळकपणे पुढे येत आहेत.

तिन्ही बाजूंनी उमेदवारांची चुरस वाढत असल्याने निवडणुकीचा कल स्पष्ट होण्यासाठी अजून वेळ लागेल. मात्र वाढलेली राजकीय हालचाल, विविध गटांतील मोर्चेबांधणी आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याचा वेगवान प्रयत्न यामुळे मोर्शीतील निवडणूक अधिक रंगतदार होणार हे निश्चित झाले आहे.

# जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षा सुरळीत

## जिल्हाधिकाऱ्यांची परीक्षा केंद्रांना भेट

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 24 )** – जिल्ह्यात आज 36 केंद्रांवर महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत जिल्ह्यात पेपर एकसाठी 5 हजार 865 तर पेपर दोनसाठी 9 हजार 365 नोंदणी केली. यापैकी पेपर एकसाठी 5 हजार 530 तर पेपर दोनसाठी 8 हजार 856 परीक्षार्थींनी परीक्षा दिली. ही परीक्षा सर्व केंद्रांवर सुरळीतपणे पार पडली.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज जिल्हा परिषद कन्या शाळा, ज्ञानमाता हायस्कूल आणि होली क्रॉस शाळा येथील शिक्षक पात्रता परीक्षा केंद्राला भेट दिली, तसेच ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सूचना केली. श्री. येरेकर यांनी परीक्षार्थींना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले. जिल्हा परिषद कन्या शाळा येथील केंद्रालगत जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीचे काम सुरू आहे. या ठिकाणी बांधकामाचा आवाज होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी सदर काम परीक्षा काळात बंद ठेवण्याचे निर्देश दिले. त्यानंतर त्यांनी होली क्रॉस आणि ज्ञानमाता हायस्कूल येथील परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या. यावेळीही त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत येणाऱ्या परीक्षार्थींना परीक्षेसाठी बसू देण्याची सूचना केली. परीक्षा केंद्रावर परीक्षार्थींचे आधार कार्ड आणि प्रवेश पत्र तातडीने तपासण्यात यावे, त्यांना वर्ग खोल्यांमध्ये प्रवेश देण्यात यावा. परीक्षेदरम्यान परीक्षार्थींना कोणतीही अडचण होणार नाही किंवा बाधा येणार नाही, याची काळजी घेण्याची निर्देश दिले.



सदर परीक्षा आयोजनाचे काम जिल्हा संनियंत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आणि उपाध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. परीक्षा संचालन व्यवस्थित व्हावे, यासाठी केंद्रसंचालक, सहाय्यक परिरक्षक, झोनल अधिकारी व परीक्षेशी संबंधित सर्व यंत्रणा होती. जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय व शिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत परीक्षेचे संपूर्ण संनियंत्रण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आली. सर्व परीक्षा केंद्रांवर निगराणीसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले.

जिल्हाधिकारी यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी व योजना शिक्षणाधिकारी कार्यालयाचे भरारी पथकाव्दारे परीक्षा केंद्रांना भेटी देण्यात आल्या. संपूर्ण परीक्षा पारदर्शक व शिस्तबद्ध होण्यासाठी परीक्षार्थींची बायोमॅट्रिक, स्क्रिनिंग व फेस रिकगनिशन प्रक्रिया राबविण्यात आली.

# भाजपने तिरमारेंचे लक्ष्य का हटविले...?

**वार्तापत्र**
**बादल डकरे**
**चांदूर बाजार**
**भ्रमणध्वनी क्रमांक-9975854638**

चांदूर बाजार नगर परिषद निवडणुकीत भाजपने अचानकपणे अनुभवी आणि निष्ठावान कार्यकर्ते गोपाल तिरमारे यांना उमेदवारी न दिल्याने स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. अनेक वर्षे पक्षासाठी निष्ठेने काम करणारे तिरमारे हे नेहमीच आपल्या आडनावाप्रमाणे विरोधकांना आपल्या तिराने लक्ष्य करणारे, आक्रमक आणि लोकाभिमुख नेते म्हणून ओळखले जातात.

माजी आमदार बच्चू कडू यांना थेट आव्हान देणारे म्हणून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली होती. सत्ता बदलानंतर तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना सुरक्षा देखील दिली होती. बूथस्तरापासून संघटन बांधणी, जनसंपर्क, विकासकामांचा पाठपुरावा, सामाजिक-शैक्षणिक उपक्रम—अशा सर्व क्षेत्रांत त्यांनी सातत्याने सक्रिय भूमिका निभावली. त्यामुळे तिरमारे यांची प्रतिमा एक विश्वासू आणि कार्यक्षम कार्यकर्त्याची बनली. मात्र उमेदवारी निश्चित करताना पक्षाने अचानक दुसऱ्या व्यक्तीची निवड करताच भाजपच्या तळागाळात नाराजीचा सूर जोर




चढला आहे. तिरमारे यांच्या निष्ठेचा, संघर्षाचा आणि लोकाधाराचा सन्मान न करता त्यांना बाजूला करणे अन्यायकारक आहे. असे कार्यकर्त्यांचे स्पष्ट मत आहे. स्थानिक नागरिकांनीही नाराजी व्यक्त करत सांगितले की, तिरमारे यांनी वैयक्तिक पातळीवर अनेकांना मदत करून विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. त्यामुळे त्यांना उमेदवारी न देणे मतदारांसाठीही धक्कादायक ठरले आहे. या निर्णयामागे विधानसभा निवडणुकीतील काही राजकीय गणितांचा संदर्भही जोडला जातो. त्यावेळी तिरमारे हे विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांच्याविषयी नाराज असल्याच्या चर्चा होत्या. प्रहार पक्षासोबत त्यांची 'छुपी युती' असल्याच्या अफवा देखील पसरल्या होत्या. मात्र विधानसभा निकालानंतर तायडे यांच्या विजयी रॅलीत तिरमारे हातात त्रिशुल घेवून नाचताना दिसले.

पक्षाच्या या निर्णयामागील खरी कारणे अद्याप स्पष्ट नसल्याने राजकीय चर्चांना चांगलाच ऊत आला आहे. तिरमारे समर्थकांनी त्यांच्यापाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला असून, येत्या काही दिवसांत कार्यकर्त्यांचा दबाव वाढण्याची शक्यता आहे. नगर परिषद निवडणूक जवळ येत असताना भाजप या नाराजीचे व्यवस्थापन कसे करते आणि तिरमारे यांची पुढील भूमिका काय राहते, हे पहणे उत्सुकतेचा विषय ठरणार आहे.

RNINO-46975/1985 | Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ | महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

## सरकारच्या माध्यमातून
# मुंबईचा विकास करणार
### महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचा विश्वास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
मुंबईच्या निवडणुकीसाठी भावनिक करत मतदान करण्याचा राज ठाकरेंचा प्रयत्न आहे. मला वाटते कुठलीही निवडणूक शेवटची नसते, मुंबईकरांकडून विकसित मुंबईच्या आराखड्याला मते मिळणार आहेत, असे म्हणत भाजपचे नेते तथा मंत्री बावनकुळे यांनी राज ठाकरेंवर निशाणा साधला आहे.



बावनकुळे म्हणाले की, मनपाच्या निवडणुका अजून जाहीर झालेल्या नाही. ज्यावेळी मुंबई मनपाची निवडणूक जाहीर होईल त्यावेळी महायुतीचे नेते एकत्र बैठक घेतील. मुंबई मनपाची निवडणूक आम्ही महायुती म्हणूनच लढणार आहोत.

बावनकुळे म्हणाले की, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेली टीका महाराष्ट्र सहन करणार नाही. ज्या ज्या वेळी देवेंद्र फडणवीस यांच्यावर काँग्रेसकडून व्यक्तिगत टीका करण्यात आली त्यावेळी महाराष्ट्राने काँग्रेसला पराभूत करत फडणवीसांच्या मागे महाराष्ट्र उभा राहील.

**महायुतीला ५१ टक्के मते मिळणार**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपला अत्यंत अनुकूल वातावरण आहे. या अनुकूल वातावरणाच्या माध्यमातून या ठिकाणी जनतेच्या अपेक्षा अशा आहेत की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे डबल इंजिन सरकारच या महाराष्ट्राच्या विकासासाठी काम करू शकते.

नागरी विकास हा डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून होऊ शकतो. यामुळे नगर पालिकेच्या निवडणुकीत ७१ टक्के मते महायुतीला आणि भाजपला मिळतील.

**मुंबई विकसित करण्याचा प्रयत्न**

बावनकुळे म्हणाले की, मुंबईच्या निवडणुकीसाठी भावनिक करत मतदान करण्याचा राज ठाकरेंचा प्रयत्न आहे. मला वाटते कुठलीही निवडणूक शेवटची नसते. प्रत्येक निवडणुकीचे वेगवेगळे महत्त्व असते.

मुंबई निवडणुकीचे महत्त्व आहे की मुंबई शहराला आंतरराष्ट्रीय लेव्हलवर डेव्हलपमेंट करणे, २०२९, २०३५आणि २०४७ मधील मुंबईचा आराखडा देवेंद्र फडणवीस यांनी तयार केला आहे. मुंबईकरांकडून विकसित मुंबईच्या आराखड्याला मते मिळणार आहेत. जात-धर्म हे राजकारण करत मते मिळणार नाही.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, निधी वाटपाचा निर्णय अजित पवार, एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मिळून करत असतात. विकास निधीचे वाटप करत असताना तिन्ही नेते बसतात. कुठेही विकास निधीवाटपाबद्दल असे होत नसते. तो प्रचारातील एखादा मुद्दा असेल. परंतु, एकट्याने कोणताच निर्णय होत नाही.

# ॲग्रोस्पेक्ट्रम मासिकाच्या अंकाचे अनावरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
कृषी क्षेत्रातील बी-२-बी मासिक ॲग्रोस्पेक्ट्रमचा डिसेंबर अंकाचे आज १६ व्या ॲग्रोव्हिजनच्या समारोप सोहळ्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

ॲग्रोस्पेक्ट्रम हे कृषी व संलग्न क्षेत्रांवरील एमएम ॲक्टिव्ह साय-टेक कम्युनिकेशन्सचे बी-२-बी मासिक असून, ॲग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष आणि एमएम ॲक्टिव्ह साय-टेक कम्युनिकेशन्सचे व्यवस्थापकीय संचालक रवी बोरटकर हे या प्रकाशक आहेत.

या अंकामध्ये कृषी क्षेत्रातील एआय, एमएल आणि आयओटी सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत गडकरी यांची मुलाखत प्रकाशित करण्यात आली आहे. तसेच ॲग्रोव्हिजनदरम्यान आयोजित उद्घाटन सत्र, स्टार्टअप्सविषयक सत्र आणि एआय विषयक सत्रांसह सर्व महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे सविस्तर अहवाल या अंकात समाविष्ट आहेत.

या अंकामध्ये हवामान आधारित ॲग्रीटेक, पशुधन प्रजननातील नवकल्पना, शेतीसाठी रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञान, सीड टेक आणि प्रिसिजन फार्मिंग अशा महत्त्वाच्या विषयांवर उद्योग नेते व कृषीविशेषज्ञांचे लेख प्रकाशित आहेत. तसेच जॉर्ज कुरियन, राज्य मंत्री झ्र अल्पसंख्याक व्यवहार आणि मत्स्य, पशुसंवर्धन व डेअरी यांची सागरी मासेमारी जनगणना २०२५ विषयक मुलाखतही समाविष्ट आहे. याशिवाय कृषि उद्योग क्षेत्रातील मान्यवर जूजार खोिवाला (चेअरमन व संचालक, बायोस्टॅड्ट ग्रुप), नवनीत रावीकर (ग्रुप चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक, लीड्स कनेक्ट सर्व्हिसेस) यांच्या ॲग्री बायोलॉजिकल्स आणि ॲग्रीटेक क्षेत्रातील माहितीपूर्ण मुलाखतीही या अंकात प्रकाशित आहेत. डिसेंबर अंकातील मुख्य लेखात भारतातील मत्स्य, पशुधन आणि प्राथमिक शेती क्षेत्रात ॲग्रीटेकद्वारे होणाऱ्या महत्त्वपूर्ण बदलांचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच रीजनरेटिव्ह कॉटन फार्मिंग विषयावरील विशेष लेखामध्ये पुनरुत्पादक कापूस शेती पद्धतींचा सखोल अभ्यास मांडला आहे.

माहितीपूर्ण लेख आणि मुलाखतींबरोबरच, या अंकामध्ये केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या डिमांड-ड्रिव्हन R&D विषयक व्हिडिओ बाइट्स, साखर उद्योग, तसेच क्ठअफच्या नव्या उपक्रमांविषयी माहिती देणारे दफ कोड्सही समाविष्ट करण्यात आले आहेत.



यशस्वी शेतकऱ्यांचे अनुभव व मेहनतीची माहिती प्रत्येक शेतकऱ्याने घेण्याची गरज आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन योग्य वाटचाल केल्यास यशस्वीतेचा मार्ग निश्चित सापडू शकतो, आताच्या काळात पारंपारिक शेतीचे ज्ञान आणि कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञानाला मिळून शेती करण्याची गरज आहे. त्यातून शेतकऱ्यांचा विकास होईल, असे गडकरी म्हणाले.
मी अपयशी शेतकरी आहे. माझा संत्र्याच्या बगिचा ३ ते ४ वर्षात वाळला. तेथील झाडे मला काढून टाकावी लागली. आता मला पून्हा २ हजार संत्र्यांची झाडे लावायची आहे. मी आता ॲग्रोव्हिजन प्रदर्शनीतील एक गोष्ट लक्षात ठेवणार आहे. त्यात संत्र्यांचे यशस्वी पिक घेऊन करोडपती होणाऱ्या शेतकऱ्यांची माहितीचा आधार घेऊन बगिचा लावण्याचा प्रयत्न करेल. एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती करण्यासाठी आपण १ हजार शेतकऱ्यांची निवड करणार आहोत. हे शेतकरी आपण अमरावती विद्यापीठ, अकोला आणि नागपूर जिल्ह्यातील निवडणल्यास सर्वत्र हे तंत्रज्ञान पोहचणे शक्य होणार आहे. सध्या विदर्भात चांगल्या नर्सरी व झाड उपलब्ध नाही. त्यामुळे आता ५० अद्यावत नर्सरी तयार करू, असेही नितीन गडकरी म्हणाले.

# चारित्र्यावरील संशयातून पतीने चिरला पत्नीचा गळा

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २४ :
पत्नीच्या चारित्र्यावरील संशयावरून दोघांमध्ये वाद सुरू होते. याच कारणावरून संतापाच्या भरात पतीने पत्नीची चाकूने गळा चिरून हत्या केल्याची खळबळजनक घटना शहरातील अकोट फाईल भागात सोमवारी घडली.

पती-पत्नीचे वेगळे होण्यासाठी न्यायालयात घटस्फोटाचे प्रकरण सुरू होते. दरम्यान, वाद टोकाला गेला आणि पतीने पत्नीचा जीव घेतला. या रक्तरंजित थराराने अकोला शहर चांगलेच हादरले. अकोट फाईल पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.

कौटुंबिक वाद, संशय याला वेळीच आवर घालण्याची गरज असते. अन्यथा मोठा अनर्थ घडू शकतो. त्याचा प्रत्यय अकोला शहरातील घटनेवरून समोर आला आहे. शहरातील अकोट फाईल पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या राजू नगर येथील रहिवासी शेख राजू शेख निजाम (वय ४१ वर्ष) व त्यांची पत्नी शेख शमीम शेख राजू (वय ३६ वर्ष) यांच्यात कौटुंबिक वाद होते.
पती-पत्नीच्या चारित्र्यावरून संशय घेत होता. पती-पत्नीमध्ये सातत्याने वाद होत असल्याने दोघांनीही घटस्फोटासाठी न्यायालयात याचिका दाखल केली होती. हे प्रकरण न्यायालयात सुरू असतानाही शेख राजू व शेख शमीम हे दोघेही एकत्रित राहत होते.

दोघांमधील वाद नियमित व्हायचे. शेख राजू याने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन सोमवारी सकाळी पुन्हा वाद घातला. दोघांमधील हा वाद विकोपाला गेला. शब्दाला शब्द वाढत गेल्याने पतीचा राग अनावर झाला. त्यातून आरोपी पती शेख राजू याने घरातील धारदार चाकूने पत्नी शेख शमीम यांच्या गळ्यावर सपासप वार केले.
या प्राणघातक हल्ल्यामध्ये पत्नी गंभीर जखमी झाली. परिसरातील नागरिकांनी तत्काळ जखमी विवाहितेला उपचारार्थ सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान पत्नीचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच अकोट फाईल पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. आरोपी शेख राजू शेख निजाम याला ताब्यात घेतले. घटनास्थळावर ठसे तज्ज्ञ, श्वान पथक देखील दाखल झाले होते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. या प्रकरणात अकोट फाईल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. आरोपीच्या अटकेची कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शेख रहीम, सपोनि जनार्धन खंडेराव, पोउपनि शेख, डी. बी. पथक तसेच अकोट फाईल पोलिसांनी केली. शहरातील या हत्याकांडामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

## पिकनिकसाठी गेलेल्या मित्रांवर हल्ला
# एक ठार, एक गंभीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :
खापरखेडा परिसरातील बिना संगम येथे रविवारी सायंकाळी पिकनिकसाठी गेलेल्या तीन मित्रांवर अनोळखी तरुणांच्या टोळक्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात आशिष रोशन गोंडाणे यांचा मृत्यू झाला तर सुशिलकुमार मोतीराम गेडाम गंभीर जखमी झाला आहे.

सुशिलकुमार गेडाम (वय ३३, रा. पाहुणे ले-आऊट, पिवळी नदी, नागपूर) हे आशिष गोंडाणे (वय ३३) आणि सचिन मुनिमहेश मिश्रा (वय ३१) यांच्यासह पिकनिकसाठी गेले होते. दुपारी सचिन मिश्रा काही कामानिमित्त ठिकाण सोडून गेला. सायंकाळी सुमारे १७.३० वाजता ४ ते ५ अनोळखी तरुणांनी त्यांच्याजवळ येऊन लायटर मागितला. लायटर दिल्यानंतर आरोपींनी किरकोळ कारणावरून शिवीगाळ करणे सुरू केले. फिर्यादी आणि आशिष यांनी त्यांना मज्जाव केला असता आरोपींनी दोघांवर दगडांनी हल्ला केला.

या हल्ल्यात सुशिल गेडाम बेशुद्ध झाला तर आशिष गोंडाणे यांना छातीत चाकूने वार करून गंभीर जखमी करण्यात आले. दोघांनाही तातडीने कामठी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुशिल गेडाम यांच्यावर सध्या मॅक्स हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. क्षुल्लक कारणावरून एका तरूणाला जीव गमवावा लागला. या प्रकरणी खापरखेडा पोलिस ठाण्यात सुशिल गेडाम यांच्या तक्रारीवरून ुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आरोपींचा शोध घेत असून तपास सुरू आहे. या घटनेने परिसरात दहशत निर्माण झाली असून पोलिसांनी शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

# पोटफुगी आणि उपचार

लोकारोग्य

अन्न हे पूर्ण ब्रह्म आहे 'असं म्हणतात,म्हणूनच समोर आलेल्या पानातील अन्नाला मन देऊन अन्न सावकाश मन लावून खावं जेणे करून खाल्लेल्या अन्नाचे निसर्ग नियमाप्रमाणे व्यवस्थित पचन होईल आणि पुढील शारीरिक क्रिया देखील सुरळीत होतील. परंतु आपल्यापैकी अनेकांना अपचनाचा त्रास होतोआणि अपचनाचा हा त्रास थेट आपल्या पोटाशी संबंधित असतो.

वेळी अवेळी जेवण, अरबटचरबट, मसालेदार, चमचमीत खाण, जेवल्यानंतर लगेचच झोपणं अशा अनेक कारणामुळे अपचन होतेच, परंतु पोट फुगीचा त्रास सुरु होतो. पोटातील अन्ननलिकेशी जोडलेले जे नळ असतात ते फुगतात आणि मग पोटदुखीचा त्रास वाढतो. मुळात पोटदुखी किंवा नळ फुगणे हा त्रास किंवा आजार काय आहे? पोटफुगीची लक्षण नेमकी काय असतात?आणि यामागची कारण काय? अर्थात पोटफुगीचा त्रास नको असेल तर उपाय काय या संधर्भात गॅस्ट्रोलॉजिस्ट डॉ. मोहन सोहोनी यांच्याशी केलेली बातचीत.

**पोटदुखी हा आजार नेमका काय आहे?**

■ पोटदुखी हा आजार नसून हि एक नैसर्गिक बाब आहे. अनेकदा अपेक्षेपेक्षा जास्त खाल्लं जात आणि त्यामुळे आपल्या पोटात गॅस जमा होतो. अन्न नलिकेशी जोडलेले जे नळ असतात ते फुगतात आणि पोट अतिशय फुगल्यासारखे गच्च वाटते. हि एक सामान्य स्थिती आहे जी दैनंदिन जीवनात प्रत्येकालाच होऊ शकते.

अनेक लोकांमध्ये हि समस्या सामान्य असली तरी काही लोकांमध्ये हार्मोनल चढउतार किंवा पाचक समस्येमुळे या समस्येची तीव्रता वाढते.



मात्र हा एक साधारण विकार असून तो आजार नाही.
पोटफुगीची हि क्रिया काही काळ असते नंतर पुन्हा आपण पूर्ववत होतो.

**पोट फुगीची कारण नेमकी काय आहेत?**

■ पोट फुगण्याची अनेक कारणं सांगता येतील. या यामध्ये पोट आणि आतड्यात गॅस होणे हे सांगता येईल जे अपचनामुळे होते. जेंव्हा लहान आतड्यात बॅक्टेरियाची संख्या वाढते आणि आतड्यात इतर जिवाणू वाढतात त्यामुळे देखील पोट दुखते.गॅस्ट्रोपॅरॅसिस म्हणजे पोटाची हालचाल न झाल्याने पोट फुगते आणि आतड्यामध्ये अडथळा येतो.

मासिक पाळीच्या आधी स्त्रियांमध्ये हार्मोन्स बदलतात त्यामुळे देखील पोट फुगते,स्वादुपिंडाचा विकार,पोटाची किंवा आतड्याची जळजळ, मोटिलिटी विकार वजन वाढणे, खरात, आंबट, तिखट पदार्थांचे अतिसेवन अशा अनेक कारणामुळे पोट फुगते.

**पोट फुगण्याची किंवा पोटातील नळ भरण्याची लक्षण काय आहेत?**

पोट फुगी किंवा नळ फुगण्याची लक्षण म्हणजे बद्धकोष्ठता हे प्रमुख लक्षण सांगता येईल.

यामध्ये शौचास व्यवस्थित न होणे किंवा त्रास होणे. खाण्याची इच्छाच मारते. थोडे खाल्ले तरी पोट अगदी टम भरल्यासारखे वाटते,छातीमध्ये सतत जळजळ होते, मळमळ आणि उलटी आल्यासारखे देखील वाटते. ओटीपोटात प्रचंड वेदना होतात आणि वारंवार ढेकर येतात, अनेकदा अतिसार अर्थात जुलाब देखील लागतात,पोटात प्रचंड गॅस साठल्यासारखे वाटते आणि सतत शौचास जावेसे वाटते हे प्रामुख्याने लक्षण सांगता येतील.

**पोटफुगीवर उपाय नेमका काय आहे?**

■ पोटात खूप दुखत असेल ब्लॉटिंग होत असेल,भूक कमी होत असेल,बद्धकोष्ठतेचा त्रास खूप होत असेल,ओटीपोटात खूप दुखत असेल तर अशा वेळी तात्काळ डॉक्टरकडे जायला हवं. पोट फुगीच्या त्रासापासून मुक्तता मिळवायची असेल तर बडीशेप किंवा पेपरमिंट, हळद, कामॉइल आणि आले यांचा समावेश असलेले हर्बल चहा पचन आणि गॅसमध्ये मदत करतात.

अँटासिड हे औषध पोटातली जळजळ कमी करण्यास मदत करते. मॅग्नेशियमचा नैसर्गिक रेचक असतो आणि पोटातली ॲसिड बेअसर करणायास आणि आतड्यासंबंधी स्नायूंना आराम करण्यास मदत करते. नियमित व्यायाम,आहारात फायबरचा समावेश केल्याने देखील पोटफुगीचा त्रास कमी होतो, भरपूर पाणी पिणे, प्रक्रिया केलेले पदार्थ टाळणे,अशा उपायांनी देखील पोट फुगीचा त्रास हा कमी करता येणे शक्य आहे. ■ ■ ■

## शाश्वत आरोग्य परिसंस्थेला बळकटी देणारा
# मेडी असिस्टचा एआय स्टॅक सादर

भारतातील सर्वात मोठी तंत्रज्ञान-नेतृत्वाखालील आरोग्य लाभ प्रशासक, मेडी असिस्ट हेल्थकेअर सर्व्हिसेस लिमिटेड (श्मेडी असिस्टश किंवा श्कंपनीश), ने नवीन एआय-चालित प्लॅटफॉर्मची घोषणा केली जे शाश्वत फायदे आणि सहज अनुभव देण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाला पुढे नेतील. हे प्लॅटफॉर्म सदस्यांशी संवाद साधण्यास आणि आरोग्य लाभ मूल्य साखळीमध्ये पारदर्शकता, अखंडता आणि दीर्घकालीन शाश्वतता मजबूत करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.



गेल्या वर्षभरात, मेडी असिस्टने कॅशलेस आरोग्यसेवा खरोखरच अखंड बनवण्याच्या आपल्या ध्येयाला गती दिली आहे. प्रमुख निकालांमध्ये हे समाविष्ट आहेः सर्व डिस्चार्जपैकी १५% - ४,००,००० हून अधिक सदस्य - आता अंतिम बिल तयार होण्यापूर्वीच रुग्णालय सोडत आहेत. त्याच्या प्रदात्या नेटवर्कच्या २५% (४,०००+ रुग्णालये) ने पुढील पिढीचे कॅशलेस वर्कफ्लो सक्षम केले आहेत.एकूण दाव्याच्या ७०% मूल्य आता कॅशलेसवर प्रक्रिया केले जात आहे.

८५% कॅशलेस दावे डिजिटल पद्धतीने सादर केले जातात, ज्यामुळे वेग सुधारतो आणि सर्व भागधारकांसाठी संघर्ष कमी होतो.सेवा वितरण अधिक मजबूत करण्यासाठी, मेडी असिस्टने दोन एआय-संचालित प्लॅटफॉर्मची घोषणा केली: मेडी असिस्टचे सीईओ सतीश गिदुगु म्हणाले, भारताची आरोग्य व्यवस्था एका वळणाच्या टप्प्यावर असताना, पुढील दशक कनेक्टेड डेटा आणि इंटेलिजेंट ऑटोमेशनद्वारे परिभाषित केले जाईल. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी, तंत्रज्ञान आणि एआय दोन्ही विमा कंपन्यांना फसवणूक, कचरा आणि गैरवापर ओळखण्यास आणि कमी करण्यास सक्षम करत आहेत; ज्यामुळे थेट खर्च बचत आणि सुधारित ऑपरेशनल कार्यक्षमता मिळते. आपल्या आरोग्य विमा पायाभूत सुविधांमध्ये डिजिटल विश्वास आणि पारदर्शकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. ■ ■ ■

## औषधी आवळा



आवळ्यामध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. यात व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढवते, त्वचा उजळ करते आणि डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. याव्यतिरिक्त, आवळा पचनक्रिया सुधारतो, चयापचय वाढवतो आणि स्मरणशक्ती तसेच एकाग्रता सुधारण्यास मदत करतो. आवळ्यामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी मदत करतात. आवळा त्वचेला निरोगी ठेवतो. हे त्वचेतील कोलेजनचे उत्पादन वाढवते आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्मांमुळे वृद्धत्वाची प्रक्रिया कमी करते.

आवळ्यातील व्हिटॅमिन सी डोळ्यांचे स्नायू बळकट करते आणि दृष्टी सुधारण्यास मदत करते, तसेच मोतीबिंदू रोखण्यास मदत करू शकते.आवळा पचनसंस्थेसाठी चांगला आहे. तो पचनास मदत करतो आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करतो.आवळ्यातील पोषक तत्वे मेंदूच्या पेशींचे संरक्षण करतात आणि स्मरणशक्ती व एकाग्रता सुधारण्यास मदत करतात. आवळ्यामुळे चयापचय वाढतो, ज्यामुळे शरीरातील चरबी कमी होण्यास मदत होते. ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## भाजप जिल्हा उपाध्यक्ष ॲड. कुणाल चोरडियांचा राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २४ :
भाजपचे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष ॲड. कुणाल चोरडिया यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या असहकाराला कंटाळून आपल्या पदाचा तसेच पक्षातील सर्व जबाबदाऱ्यांचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे.
ॲड. चोरडिया यांनी आपल्या पत्रात स्थानिक नेतृत्वावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. काही स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून सातत्याने होणारा बहिष्कार, अविश्वासाचे वातावरण यामुळे काम करणे अशक्य झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.





■ **नागपूर :** *शहरात बुक फेअर अर्थात पुस्तक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. वाचन संस्कृती लोप पावत असताना वाचनाची गोडी लागावी, हा देखील या मागचा उद्देश आहे. दरम्यान, या पुस्तक मेळाव्यात अनेक नामवंत लेखकांच्या पुस्तकांबरोबरच इतरही लक्षावधी पुस्तके ठेवण्यात आली असून, पुस्तक प्रेमींची मोठ्या प्रमाणात गर्दी होऊ लागली आहे.*

## सामूहिक आत्मसमर्पणासाठी
# नक्षल्यांनी वेळ मागितला



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
केंद्र सरकारने देशातून नक्षलवादाचे उच्चाटन करण्यासाठी ३१ मार्च २०२६ ही अंतिम मुदत दिली असताना, महाराष्ट्र-मध्यप्रदेश-छत्तीसगढ स्पेशल झोनल कमिटीने (भाकपा-माओवादी) तीनही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. या पत्राद्वारे त्यांनी सामूहिक आत्मसमर्पण आणि शस्त्रे खाली ठेवण्यासाठी १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंतची मुदत मागितली आहे. केंद्र सरकारच्या कठोर कारवाई, भूपती आणि नर्मदाक्काचे आत्मसमर्पण तसेच हिडमाच्या मृत्यूनंतर नक्षलवाद्यांनी हा निर्णय घेतला आहे.

नक्षलवाद्यांनी पत्रात नमूद केले आहे की, त्यांचा कोणताही छुपा हेतू नाही. एकमेकांशी संपर्क साधून सहमती मिळवण्यासाठी वेळ लागणार असल्याने त्यांनी १५ फेब्रुवारी २०२६ ही मुदत मागितली आहे.

या पत्रात, सर्वजण मिळून आत्मसमर्पण करतील असे म्हटले आहे. महाराष्ट्रात आत्मसमर्पण करणारे भूपती आणि छत्तीसगडमध्ये आत्मसमर्पण करणारे सतीश यांच्या पावलावर पाऊल ठेवून हा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतिम मुदतीपर्यंत सुरक्षा दलांनी कोणतीही कारवाई करू नये, अशी विनंती त्यांनी केली आहे. तसेच, माओवाद्यांनी मुख्यमंत्र्यांना काही दिवसांसाठी न्यूज नेटवर्क बंद करण्याचीही विनंती केली आहे.
नक्षलवाद्यांनी येणारा वार्षिक पीपल्स लिबरेशन गुरिल्ला ॲक्शन सप्ताह साजरा करणार नाहीत असे आश्वासन दिले आहे.

# ॲग्रोव्हीजनचे कार्यक्रम वर्षभर

पान १ वरून...
डॉ. शरद गडाख, माफसु चे कुलगरू डॉ. नितीन पाटील, आणि अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी पुढे म्हणाले की यंदाच्या ॲग्रो व्हिजनमध्ये मोठ्या प्रमाणात युवावगनि रस घेतला तसंच दररोज हजारो युवकांनी भेट दिली. तसेच जवळजवळ सव्वा लाख शेतकऱ्यांसह विविध संशोधक उत्पादनकर्ते, कंपन्या आणि कृषी संबंधित व्यावसायिकांनी भेट दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आनंद व्यक्त केला.

ॲग्रोव्हीजनच्या १६ व्या वर्षात मागे वळून पाहताना गेल्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांमुळे शेतकरी आत्महत्यांमध्ये कपात, विदर्भात शेतीपूरक उद्योगांमध्ये वाढ, एनडीडीबी च्या विदर्भातील कार्यामुळे दूध उत्पादनाचा शेतीपूरक व्यवसाय म्हणून विकास, तसेच इतर शेती आणि जोडधंद्यांमध्ये वाढ झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. स्पेनमध्ये ज्या धरतीवर लिंबूवर्गीय फळांची लागवड केली जाते आणि संत्रा तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे त्याच धर्तीवर विदर्भातील शेकऱ्यांना संतरा तंत्रज्ञान देण्याच्या प्रयत्नाचा त्यांनी उल्लेख केला.

सुरूवातीला रवी बोरटकर यांनी ४ दिवसीय आयोजनातिल वैशिष्ट्यपूर्ण बाबी आणि सामंजस्य करार यासह विविध उपक्रमांचा आढावा घेतला. त्यांनंतर ॲग्रो स्पेक्ट्रम मासिकाचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सीडी मायी यांनी केले.

**शेतकरी पुरस्कार**

यावेळी ॲग्रोव्हीजन शेतकरी पुरस्काराने उत्कृष्ट काम करणाऱ्या शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले. यात यवतमाळ मधील दुग्धउत्पादनसाठी नरसिंग धावरा जाधव, संतरा पिकासाठी अजिंक्य दिगंबर तिडके, कृषिपूरक व्यवसाय आणि भात शेतीसाठी वंदना वैद्य, शेतकरी जागृती आणि कृषि पूरक व्यवसायसाठी अशोकराव शिवराम वानखेडे, बचतगट प्रकारात जितेंद्रसिंग गोराम यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रयोजकांचा देखील सत्कार करण्यात आला.

--------------

**रस्ते सुरक्षा पथ नाट्य**

ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाच्या समारोपय कार्यक्रमाच्या आधी जनआक्रोश फॉर बेटर टुमारो या संस्थेतर्फे पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी रस्ते अपघाताची प्रमुख कारणे यावर एसएफएस महाविद्यालयाच्या सोळा विद्यार्थ्यांनी दहा मिनिटाच्या पथनाट्याचा सादरीकरण केलं. यावेळी जनआक्रोश तर्फे रवींद्र कासखेडीकर आणि चमू यांची उपस्थित होती.